


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७९ | शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# ‘आत्महत्या करणारा शेतकरी पंचांग पाहत नाही; पंचनाम्याचे मुहूर्त खड्ड्यात घाला’

## मराठवाड्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करा–उद्धव ठाकरे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**कर्नाटक सरकारने १७ ऑगस्टलाच दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दिशेने काम सुरू केले; मात्र महाराष्ट्र सरकारने पीक नुकसानीच्या पंचनाम्यांसाठी तब्बल ५ ऑक्टोबरचा मुहूर्त काढला आहे. पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची पिके हातातून जात असताना पंचनाम्यांसाठी आणखी प्रतीक्षा कशासाठी, असा संतप्त सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ‘‘तोपर्यंत तुम्ही शेतकऱ्याच्या मरणाची वाट बघता का?’’ असा थेट सवाल करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली.**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयाजवळ सरकारविरोधात मराठवाडा विकासाच्या प्रश्नांवर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, पक्षाचे नेते चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. ‘आत्महत्या करणारा शेतकरी पंचांग पाहून आत्महत्या करत नाही. तो दुःख भोगून आत्महत्या करत आहे. त्यामुळे पंचनाम्याचे हे मुहूर्त खड्ड्यात घाला,’’ अशा शब्दांत ठाकरेंनी सरकारवर टीका केली. ५ ऑक्टोबरपासून पंचनामे सुरू होणार असतील, तर तोपर्यंत अनेक शेतकरी आत्महत्या करून मोकळे झालेले असतील. याला सरकार जबाबदार असेल, असा आरोपही त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. ५ ऑक्टोबरपासून मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात फिरून पीक नुकसानीचे पंचनामे योग्य पद्धतीने होत आहेत की नाही, याची पाहणी करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. ज्या ठिकाणी पंचनामे सुरू असतील, तेथे शिवसैनिकांनी उपस्थित राहून प्रक्रियेवर लक्ष ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. शेतकऱ्यांच्या अडचणींकडे सरकारचे पुरेसे लक्ष नसल्याचा आरोप करत ठाकरे म्हणाले की, दुष्काळाचे दुष्टचक्र असेच सुरू राहणार असेल तर शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला केवळ बैल देण्यापेक्षा दुभती गाय देऊन दूध व्यवसायाला चालना द्यावी आणि दूध संकलन वाढवावे, अशी मागणी त्यांनी केली.मराठवाड्यातील सोयाबीनला स्थानिक पातळीवरच चांगला भाव मिळण्यासाठी प्रक्रिया उद्योग उभारण्याची गरज असल्याचेही ठाकरे यांनी सांगितले. येथील सोयाबीन परदेशात निर्यात होते. मात्र, सोयाबीनवर प्रक्रिया करणारे प्रकल्प मराठवाड्यातच उभे राहिले, तर शेतकऱ्यांना त्याचा अधिक फायदा होऊ शकतो. सरकारने या दिशेने ठोस पावले उचललेली

## थोडक्यात...

### सोने–चांदीच्या दरात घसरण

वॉशिंग्टन : अमेरिकेच्या फेडरल बँकेने व्याजदरात ०.२५ बेसिक प्वाईंटची वाढ केली आहे. या निर्णयाचा परिणाम वायदे बाजारात सोनेचांदीच्या किमतीवर झाला आहे. या निर्णयामुळे सोने चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. सोने आणि चांदीच्या दरात गुरुवारी अचानक मोठी घसरण झाली. चांदीच्या दरात ४५०० पेक्षा जास्त घसरण झाली, ज्यामुळे ती उच्चांकापेक्षा जवळपास १.९० लाख स्वस्त झाली. तर सोने २००० रुपयांनी स्वस्त झाले आहे.गुरुवारी वायदे बाजार उघडताच सोने आणि चांदीच्या दरात अचानक मोठी घसरण झाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर वायदे व्यवहार सुरू होताच, दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमती कोसळल्या. बुधवारच्या बंद भावाच्या तुलनेत १ किलो चांदीचा भाव २.३२ लाखांपर्यंत घसरला.

### विमान दुर्घटनेच्या तपासावर आरोप

नवी दिल्ली : एअर इंडिया एआय–१७१ विमान दुर्घटनेच्या सुरू असलेल्या तपासात पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप अमेरिकेतील फाउंडेशन फॉर एव्हिएशन सेफ्टी या संस्थेने केला आहे. या संस्थेने विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ला पत्र लिहून तपासाशी संबंधित महत्त्वाच्या कागदपत्रांची दखल घेतली नसल्याचा आरोप केला आहे. १२ जून २०२५ रोजी झालेल्या या दुर्घटनेत २६० जणांचा मृत्यू झाला होता.२७ ऑगस्ट २०२६ रोजी अअकइचे महासंचालक जी. व्ही. जी. युगंधर यांना पाठवलेल्या पत्रात ऋअरचे कार्यकारी संचालक एड पिअर्सन यांनी अअकइच्या तपासातील पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली. सार्वजनिक न केलेली कागदपत्रे यूके एएआयबीच्या एका तज्ज्ञामार्फत एएआयबीकडे पाठवण्यात आली होती. या कागदपत्रांमध्ये विमानाच्या विद्युत, इलेक्ट्रॉनिक आणि फ्लाइट कॉम्प्युटर यंत्रणांमधील दीर्घकाळापासून सुरू असलेल्या आणि प्रणालीगत त्रुटींची माहिती असल्याचा दावा एफएएसने केला आहे.

### विदेशातील नौकरीवर गदा

नवी दिल्ली : प्रख्यात जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी अडिडासने भारतातील टेक्नॉलॉजी विभागातील काही पदे कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुग्राममधील अडिडासच्या इंडिया टेक हबमध्ये १५ सप्टेंबरला झालेल्या टाउन हॉल बैठकीत कर्मचा–यांना या पुनर्रचनेची माहिती देण्यात आली.कंपनीने भारतातील टेक विभागातील नोकरकपातीला दुजोरा दिला आहे. मात्र, नेमक्या किती कर्मचा–यांवर याचा परिणाम झाला, हे कंपनीने स्पष्ट केलेले नाही. अडिडासच्या म्हणण्यानुसार, या पुनर्रचनेचा परिणाम भारतातील टेक्नॉलॉजी विभागातील २० टक्क्यांपेक्षा कमी कर्मचाऱ्यांवर झाला आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.१६ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,१०० | ३,१०० | २,८३५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | ३,००१ | ५,७४५ | ४,१२१ |
| मका/लोकल: १३.०० क्विंटल | २,३०० | २,७४० | २,५२० |
| तूर : ३.०० क्विंटल | ८,१९० | ८,१९० | ८,१९० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,८०० | ३,००२ | २,९०९ |
| मुग: ९.०० क्विंटल | ९,००० | ९,६०१ | ९,२७९ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,६५१ | ६,२०० | ५,९८० |

## रेल्वे सुरू: दादांच्या शब्दाची पूर्तता अन मराठवाड्याची कन्या म्हणून अभिमान

# लवकरच बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा–सुनेत्राताई पवार

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या वर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड–अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरू करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून मला विशेष अभिमान वाटत आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, येत्या काही महिन्यांत बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा सुरू करण्याचा मानस व्यक्त करत, बीड–परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल आणि त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.**





मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत बीडकरांसाठी आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक व आनंददायी ठरला आहे. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या ’बीड–पुणे’ थेट रेल्वेसेवेचा आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शानदार शुभारंभ करण्यात आला. याच भरगच्च कार्यक्रमात बीडच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाला मोठी चालना देणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि धानोरा रस्त्यावरील ’पंढरी’ येथील विज्ञान उद्यान व तारांगण प्रकल्पाचे भूमिपूजनही मोठ्या उत्साहात पार पडले. या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी खा बजरंग सोनवणे, आ प्रकाश सोळंके, आ विजयसिंह पंडित माजी आ भीमराव धोंडे नगराध्यक्ष प्रेमलता पारवे उपाध्यक्ष विनोद मुळूक ▶▶ पान २ वर

### खासदारांनी मांडला पाण्याचा महत्वाचा विषय

मराठवाड्यात विशेतः बीड जिल्ह्यात नेहमीच दुष्कजन्य परस्थिती असले यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी जायकवाडीचे पाणी सिंदफनात आन उजनीचे पाणी मांजरा धरणात सोडले तर पाण्याचा काही अंशी प्रश्न सुटेल जिल्ह्यात जाडा पाऊस झाला तर साठवणक्षमता नाही त्यामुळे मुख्यमंत्र्यांना बोलाऊन एक बैठक घ्यावे अशी विनंती त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली व त्याला सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्र्यांनी दिला.

# पुन्हा मागणी पुन्हा आश्वासन अन पुन्हा माघार

## मनोज जरंगे यांचे उपोषण स्थगित; सरकारला ३ महिन्यांची मुदत



**बीड–पाटोदा । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी गेली २० दिवस उपोषणाला बसले होते. आज सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित केले आहे. मात्र आंदोलन सुरुच राहणार असून उर्वरित मागण्या पूर्ण करण्यासाठी पुन्हा काही महिन्याचा अल्टिमेटम सरकारला देण्यात आला यापूर्वी देखील जरांगे पाटील यांनी आंदोलन उपोषण केली त्यावेळी देखील सरकारने त्यांना आश्वासने दिली आणि आंदोलन मागे घेण्यात आले आता पुन्हा एकदा सरकारने आश्वासन दिले अन जरांगे पाटील यांनी मुंबईचे आंदोलन मागे घेतले.

आंदोलन मागे घेताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी सरकार रद्द करणार नाही, हैदराबाद गॅझेटचा जीआर सुधारित करणार आहे. ▶▶ पान २ वर

### ..तोपर्यंत थांबणार नाही

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आंदोलन पूर्ण यशस्वी झाल्याशिवाय आपण थांबणार नाही, हे मी आधीच सांगितले होते. सरकार सातारा आणि कोल्हापूर गॅझेटसाठी वेळ मागत आहे. सरकार फसवणूक करत आहे असे वाटत असले, तरी त्यांना ३ महिने देऊन ही शेवटची संधी देत आहोत. या ९० दिवसांत काही फरक पडणार नाही. ५८ लाख नोंदी कमी केल्या जाणार नाहीत, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

### ओबीसी मंत्री प्रमाणपत्र देऊ देत नाही

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, सरकार ५८ लाख नोंदी कमी करणार नाही. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप करताना जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी तहसीलदारांना प्रत्यक्ष सोबत घेऊन बसावे. काही ओबीसी मंत्री अधिका–यांना फोन करून प्रमाणपत्रे वाटप करू नका असे सांगत आहेत.

# नो इन्शुरन्स नो पेट्रोल–डिझेल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाच्या विमा नाही, तर इंधन नाही या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया (आयआरडीएआय) लवकरच एका नव्या प्रणालीची चाचणी घेणार आहे. या अंतर्गत, ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन प्रणालीद्वारे वाहनांच्या नोंदणी क्रमांकांची पडताळणी इन्शुरन्स इन्फॉर्मेशन ब्युरो आणि वाहन पोर्टलवरील रेकॉर्डशी केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

आयआरडीएआय देशातील काही निवडक शहरांमध्ये या प्रणालीची चाचणी घेणार असून अद्याप शहरांची नावे निश्चित झालेली नाहीत. या प्रस्तावित यंत्रणेमुळे भविष्यात पेट्रोल किंवा डिझेल पंपांवर वैध थर्ड–पार्टी मोटार विमा नसलेल्या वाहनांना इंधन देणे बंद करणे शक्य होईल. जर ही चाचणी यशस्वी ठरली, तर विम्याविना धावणारी लाखो वाहने अधिकृत विमा बाजाराच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे.सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑगस्ट रोजी दिलेल्या निकालात आयआरडीएआयला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या ▶▶ पान २ वर

# मराठवाड्यासाठी कोकणातून ७० टीएमसी पाणी आणणार–मुख्यमंत्री



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्याला लवकरच दुष्काळ मुक्त करू, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (ता.१७) दिली. मुख्यमंत्र्यांनी ७८ व्या मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील हुतात्म्यांच्या स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी मराठवाड्याच्या पाणी प्रश्नांवर प्रतिपादन केले.

मुख्यमंत्री म्हणाले, ‘‘मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी उल्हास नदीच्या खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात तब्बल ७० टीएमसी पाणी आणण्याचे नियोजन करण्यात आलं आहे. या नदीजोड प्रकल्पाचा डीपीआर अंतिम टप्प्यात असून लवकरच काम सुरू होईल. ▶▶ पान २ वर

# दुष्काळ जाहीर करावा ही गरज, तो आपोआपच होईल–कृषीमंत्री भरणे



**पुणे । प्रतिनिधी**

महिलांना शेतकरी म्हणून ओळख देणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे, देशात आजही सातबारा हा पुरुषांच्या नावे असतो. ज्या महिलांच्या नावावर शेतीचा सातबारा नाही, पण शेती किंवा शेती व्यवसायाशी संबंधित महिलांसाठी शेतकरी प्रमाणपत्र पोर्टल सुरू करण्यात आले असून त्या महिलांना शेतकरी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे कृषी विभागाच्या विविध योजनांचा महिला शेतकऱ्यांना लाभ होईल, अशी माहिती ▶▶ पान २ वर

# दुश्मनी परळीत अन खून लातुरात

**लातूर । प्रतिनिधी**

परळीतील बाबा शेख आणि त्याचे साथीदार बिदरला आपल्या खाजगी कामासाठी जात असताना बुधवारी रात्री येथील उस्मानपुरा भागातील हॉटेल अमिर येथे जेवणासाठी थांबले होते. त्याचवेळी परळीचे नगरसेवक अल्ताफ शेख आणि त्याचे साथीदार तेथे जेवणासाठी आले. त्यांच्यात हॉटेलमध्येच वाद झाला. त्यावेळी हॉटेल मालकाने सर्वांनाच बाहेर काढले असता नगरसेवक अल्ताफ शेख आणि त्याच्या साथीदारांनी बाबा शेख आणि त्याच्या साथीदारावर धारदार ▶▶ पान २ वर

# उच्च न्यायालयात देशातील ६६ लाख प्रकरणे रखडून

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या ६६ लाखांचा टप्पा ओलांडणार असून, न्यायासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करणा–या याचिकाकर्त्यांना आता थेट सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागत आहेत. मात्र, संबंधित उच्च न्यायालयांना प्रकरणांची लवकर सुनावणी घेण्याचे निर्देश देण्याऐवजी



सर्वोच्च न्यायालयाकडून याचिकाकर्त्यांना लवकर सुनावणीसाठी अर्ज करण्याची मुभा दिली जात आहे. उच्च न्यायालयांमध्ये सुमारे १५ लाख प्रकरणे दशकाहून अधिक काळ प्रलंबित आहेत.

राजस्थानमधील जालोर जिल्ह्यातील एका आरोग्य कर्मचा–याचे प्रकरण याचे उदाहरण ठरले आहे. या कर्मचा–याची १९९९ मध्ये सेवा समाप्त करण्यात आली होती. जोधपूर कामगार न्यायालयाच्या निर्णयावर नाराज होऊन त्याने २००४ ▶▶ पान २ वर

### कोणत्या न्यायालयात किती प्रकरणे

मुंबई उच्च न्यायालयात सुमारे ६.४ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यानंतर मद्रास उच्च न्यायालयात ५.६ लाख, मध्य प्रदेश उच्च न्यायालयात ४.९ लाख, कर्नाटक उच्च न्यायालयात ३.३ लाख, तर आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात २.५ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. दिल्ली उच्च न्यायालयात सुमारे १.२ लाख, तर कलकत्ता उच्च न्यायालयात १.९ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत.

cmyk



## अग्रलेख

# डिजिटल क्रांती की आर्थिक कोंडी? धोरणांच्या घाईचा सामान्य माणसावर भार

डिजिटल भारताच्या विस्तारामुळे व्यवहारांची गती वाढली आणि युपीआयने आर्थिक व्यवहारांचे स्वरूप बदलले. आज चहाच्या टपरीपासून मोठ्या दुकानापर्यंत क्यूआरकोड सहज दिसतो. मोबाईलच्या एका क्लिकवर पैसे पाठवता येतात. ही सुविधा नाकारण्याचा प्रश्न नाही; प्रश्न आहे तो या डिजिटल विस्ताराचे नियोजन किती सर्वंकषपणे झाले आणि त्याचा सामान्य नागरिक, विशेषतः मध्यमवर्ग, यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा किती विचार झाला, याचा.

तंत्रज्ञान म्हणजे विकास आणि डिजिटल व्यवहार म्हणजे आर्थिक शिस्त, असे सरळ समीकरण मांडता येत नाही. व्यवहार सुलभ झाल्याने किरकोळ खर्चाची वारंवारता वाढू शकते आणि रोख रक्कम खर्च करताना जाणवणारी आर्थिक जाणीव डिजिटल व्यवहारात कमी होऊ शकते. त्यामुळे डिजिटल साक्षरतेबरोबरच आर्थिक शिस्त आणि खर्चाचे नियोजनही महत्त्वाचे ठरते. या चर्चेतील सर्वांत दुर्लक्षित घटक म्हणजे मध्यमवर्ग. पगार, गृहकर्ज किंवा भाडे, मुलांचे शिक्षण, आरोग्यखर्च, विमा, वाहतूक, महागाई आणि भविष्यासाठीची बचत यांचा ताळमेळ साधणाऱ्या कुटुंबासाठी प्रत्येक रुपया महत्त्वाचा असतो. त्यामुळे डिजिटल धोरणांचे मूल्यमापन केवळ व्यवहारांची संख्या आणि मूल्य वाढले यावर न करता, मध्यमवर्गाच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीवर त्याचा काय परिणाम झाला, यावरही व्हायला हवे. नोटाबंदीच्या काळात डिजिटल व्यवहारांना चालना मिळाली आणि त्यानंतर युपीआयने त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. मात्र अशा व्यापक आर्थिक बदलासाठी केवळ तंत्रज्ञानाची उपलब्धता पुरेशी नसते. पायाभूत सुविधा, ग्रामीण-शहरी डिजिटल दरी, नेटवर्कची क्षमता, सायबर सुरक्षा, ग्राहक संरक्षण, तक्रार निवारण आणि आर्थिक साक्षरता यांचे आधीच सर्वंकष नियोजन आवश्यक असते. याच ठिकाणी धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होतात. प्रशासनातील अनुभवी अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष अनुभव, अर्थतज्ज्ञांचे विश्लेषण, तंत्रज्ञान आणि बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत, ग्राहकांच्या अडचणी तसेच मंत्रिमंडळातील विविध विभागांचा अनुभवया सर्वांचा व्यापक धोरणांमध्ये किती समावेश झाला, हे महत्त्वाचे आहे. घाईने व्यवस्था उभारण्यापेक्षा तिच्या संभाव्य परिणामांचे पूर्वमूल्यमापन आणि नंतरचे पारदर्शक पुनरावलोकन अधिक आवश्यक आहे. डिजिटल व्यवस्थेतील तांत्रिक अडचणीही दुर्लक्षित करता येणार नाहीत. नेटवर्क खंडित होणे, व्यवहार अडकणे, चुकीच्या खात्यात पैसे जाणे किंवा सायबर फसवणूक झाल्यास नागरिकाला त्वरित आणि स्पष्ट तक्रार निवारण व्यवस्था मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात डिजिटल सुविधा मर्यादित असतील तर पर्यायी व्यवस्था उपलब्ध असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. डिजिटल व्यवस्था सुविधा असावी; नागरिकाची सक्ती किंवा मजबुरी नव्हे. युपीआयच्या वापरासोबत नागरिकांनीही दक्षता घेणे आवश्यक आहे. किरकोळ खर्चासाठी मर्यादित रकमेचे स्वतंत्र खाते वापरणे, युपीआय सारख्या उपलब्ध सुविधांचा योग्य वापर करणे, व्यवहारांचे संदेश तपासणे, अनोळखी लिंक किंवा क्यूआर कोडपासून सावध राहणे आणि आवश्यकतेनुसार काही रोख रक्कम जवळ ठेवणे उपयोगी ठरू शकते. परंतु डिजिटल व्यवस्थेतील प्रत्येक जोखीम नागरिकांनीच पेलायची आणि सरकारने केवळ डिजिटल व्यवहारांच्या वाढीची आकडेवारी मांडायची, हे पुरेसे नाही. डिजिटल अर्थव्यवस्थेचे यश व्यवहारांच्या संख्येबरोबरच नागरिकांच्या आर्थिक सुरक्षिततेत, मध्यमवर्गाच्या आर्थिक स्थैर्यात आणि ग्रामीण भागातील प्रत्यक्ष उपलब्धतेत मोजले गेले पाहिजे. डिजिटल भारत मागे नेण्याची गरज नाही; तो अधिक नियोजनबद्ध, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि नागरिककेंद्री करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रशासनाचा अनुभव, तज्ज्ञांचे विश्लेषण, बँकिंग क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती, मंत्रिमंडळातील सामूहिक चर्चा आणि सामान्य नागरिकाचे वास्तव यांना धोरणनिर्मितीत योग्य स्थान मिळणे आवश्यक आहे. कारण केवळ तंत्रज्ञान आणणे म्हणजे धोरण नव्हे; त्या तंत्रज्ञानाचा समाजातील प्रत्येक घटकावर होणारा परिणाम समजून घेणे म्हणजे खरे धोरणनिर्माण. डिजिटल क्रांतीची खरी कसोटीक्यूआरकोडच्या संख्येत नाही, तर त्या क्यूआरकोडच्या पलीकडे उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाच्या आर्थिक सुरक्षिततेत आहे. आणि त्यासाठी घाईपेक्षा नियोजन, घोषणेपेक्षा प्रत्यक्ष तयारी आणि एककल्ली निर्णयापेक्षा सामूहिक विचार अधिक आवश्यक आहे.

## तरुण पत्रकार आशिष रसाळ यांचे आकस्मिक निधन

**जालना । प्रतिनिधी**



जालना येथील तरुण, होतकरू पत्रकार, उत्तम निवेदक आणि उत्कृष्ट वक्ते म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे आशिष रसाळ यांचे बुधवारी, दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने जालना जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

आशिष रसाळ यांनी अल्पावधीतच पत्रकारिता क्षेत्रात आपल्या कार्याची वेगळी छाप निर्माण केली होती. पत्रकारितेसोबतच प्रभावी निवेदन आणि ओघवत्या वक्तृत्वामुळे त्यांनी विविध क्षेत्रांत आपली ओळख निर्माण केली होती. त्यांचे अचानक निधन झाल्याने पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार आणि परिचितांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून, आशिष रसाळ आपल्यातून अचानक निघून गेले आहेत, यावर अजूनही विश्वास बसत नाही, अशा भावना जालना जिल्ह्यातील पत्रकारांनी व्यक्त केल्या. त्यांच्या निधनाने एका होतकरू पत्रकाराचा अकाली अंत झाला आहे. आशिष रसाळ यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, तसेच त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, अशी प्रार्थना जालना जिल्ह्यातील सर्व पत्रकारांच्या वतीने करण्यात आली. यावेळी पत्रकार बांधवांनी रसाळ कुटुंबीयांप्रती मनःपूर्वक संवेदना व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## 'नैराश्य' वर औषधे घेताय?-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**नैराश्य आणि चिंताविकाराच्या उपचारांमध्ये समुपदेशन, मानसोपचार, व्यायाम यांच्याबरोबरच गरजेनुसार नैराश्य दूर करणाऱ्या औषधांचाही वापर केला जातो. मात्र ही औषधे स्वतःच्या मनाने सुरू करणे किंवा अचानक बंद करणे धोकादायक ठरू शकते.**

नैराश्यविरोधी औषधांच्या विविध प्रकारांपैकी एसएसआरआय प्रकारातील औषधे मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. ही औषधे मेंदूतील सेरोटोनिनसारख्या संदेशवाहक रसायनांच्या उपलब्धतेवर परिणाम करतात. त्यामुळे मनःस्थिती सुधारण्यास, चिंता व घबराट कमी होण्यास आणि नकारात्मक विचारांचे प्रमाण घटण्यास मदत होऊ शकते. या औषधांचा परिणाम तत्काळ जाणवत नाही. साधारणतः २ ते ४ आठवड्यांनंतर सुधारणा जाणवू शकते. योग्य मात्रा निश्चित करण्यासाठी आणि उपचारांचा अपेक्षित परिणाम साधण्यासाठी काही वेळा २ ते ३ महिनेही लागू शकतात. लक्षणे कमी झाल्यानंतरही डॉक्टर काही काळ औषध सुरू ठेवण्याचा सल्ला देतात. यामागे नैराश्य पुन्हा उद्भवण्याची शक्यता कमी करणे हा उद्देश असतो. औषधांमुळे काही रुग्णांना तोंड कोरडे पडणे, झोप अधिक किंवा कमी होणे, थकवा, भूक वाढणे, वजन वाढणे किंवा पचनाच्या तक्रारी जाणवू शकतात. काही व्यक्तींमध्ये लैंगिक इच्छा कमी होणे किंवा लैंगिक कार्यात बदल जाणवू शकतो. अशा वेळी औषध स्वतःहून बंद करण्याऐवजी डॉक्टरांना त्याची माहिती देणे आवश्यक आहे. योग्य वैद्यकीय देखरेखीखाली औषधाची मात्रा बदलणे किंवा दुसरे औषध देणे शक्य असते. दीर्घकाळ औषध घेतल्यानंतर ते अचानक थांबवल्यास बेचैनी, घबराट, झोपेचा त्रास, उदासी किंवा नकारात्मक विचार जाणवू शकतात. मूळ आजाराची लक्षणेही पुन्हा उफाळण्याची शक्यता असते. म्हणून डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली औषधाची मात्रा हळूहळू कमी केली जाते. प्रत्येक ताणतणाव किंवा उदासीसाठी औषधांची गरज नसते. लक्षणांचे स्वरूप, तीव्रता आणि कालावधी पाहून उपचार ठरवले जातात. सौम्य नैराश्यात नियमित व्यायाम, योग आणि मानसोपचार उपयुक्त ठरू शकतात; तर मध्यम किंवा तीव्र



नैराश्यात औषधे आणि मानसोपचार यांची सांगड अधिक परिणामकारक ठरू शकते. उपचार सुरू असताना मद्य आणि इतर मादक पदार्थ टाळणे तसेच चक्कर किंवा अतिझोप येत असल्यास वाहन चालवताना विशेष काळजी घेणेही महत्त्वाचे आहे. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## आकाशातून हल्ल्यासाठी आता 'श्वान पथक'

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

जमिनीवरील अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर आता भारतीय लष्कराचे श्वान सैनिक आकाशातून शत्रूवर झेप घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. मध्य भारतातील बेहाट ड्रॉप झोनमध्ये एका पॅराट्रूपरने संपूर्ण युद्ध साहित्यासह डॉग हँडलर आणि त्याच्या श्वानासह विमानातून यशस्वी टँडम पॅराशूट जंप पूर्ण केली. भारतीय सैन्याच्या इतिहासात डॉग हँडलर आणि श्वानाने एकत्रित केलेली ही पहिलीच अशा प्रकारची यशस्वी उडी मानली जात आहे. या श्वानांना थेट युद्धभूमीतील परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी अत्यंत खडतर बॅटल इनॉक्युलेशन प्रशिक्षण दिले जाते. बॉम्बस्फोटांचे कानठळ्या बसवणारे आवाज, गोळीबार, धूर आणि रणांगणातील गोंधळातही शांत राहून काम करण्याची सवय त्यांना लावली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावरही अशा प्रशिक्षित श्वानांचा वापर केला जातो. अमेरिकेच्या नेव्ही सीलसने ओसामा बिन लादेनविरोधात राबवलेल्या गुप्त मोहिमेतही अशाच एका श्वानाचा समावेश होता.दहशतवादविरोधी कारवाया, सीमा सुरक्षा, स्फोटके आणि भूसुरुंग शोधणे, व्हीआयपी सुरक्षा आणि नैसर्गिक आपत्तींमध्ये बचाव कार्य अशा अनेक आघाड्यांवर हे श्वान मोलाची कामगिरी बजावत आहेत. सुरक्षेसाठी भारतीय लष्कर हलक्या वजनाची 'मॉड्यूलर बुलेटप्रूफ जॅकेट्स' आणि स्मार्ट कॉलर विकसित करत आहे. नियंत्रण रेषेवर किंवा दहशतवादविरोधी कारवाईत बुलेटप्रूफ जॅकेटमुळे गोळ्या आणि छ-र्यांपासून त्यांचे संरक्षण होईल. त्याच वेळी स्मार्ट कॉलरद्वारे श्वानाचे शरीराचे तापमान, नाडीचे ठोके, श्वसनक्रिया आणि थकव्यावर २४ तास लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक स्व.उत्तमराव पाटील कोल्हे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी**

**गुरुपिंपरी : विद्यार्थ्यांनी कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यास करून यश अक्षरशः खेचून आणले पाहिजे. केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे हे ध्येय न ठेवता, आपल्या मनात यशाचे स्पष्ट ध्येय ठेवून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. पुढील वर्षी होणाऱ्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात आपलाही सत्कार व्हावा, या जिद्दीने विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले.**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक स्व.उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथील इयत्ता दहावीच्या परीक्षेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी विद्यालय संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रभाकर मामा पवार होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. राजेंद्र भोसले, उपस्थित होते. यावेळी स्वातंत्र्य सैनिक स्व.उत्तमराव कोल्हे यांचे चिरंजीव तथा माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहायक श्री. गोवर्धन उत्तमराव कोल्हे, अरविंद उत्तमराव



कोल्हे, माजी सरपंच संतोष बप्पा कोल्हे, चेअरमन प्रल्हाद आण्णा कोल्हे, उपसरपंच सुनील कोल्हे, मुख्याध्यापक बी.आर. कडूळे सर, शिक्षक आर.जी.थोरात आर.एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. गायत्री संदीप कोल्हे हिचा ₹३,१००, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. सृष्टी संतोष कोल्हे हिचा ₹२,१००, तर तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. स्वाती परमेश्वर वाघमारे हिचा ₹१,१०० रोख पारितोषिक, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. स्वातंत्र्यसैनिक स्व. उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांनी हैदराबाद संस्थानातील नागरी अवज्ञा आंदोलनात सक्रिय सहभाग, निजामाच्या आदेशांना अहिंसक पद्धतीने विरोध करणे, सत्याग्रह करणे, जनजागृती करणे, राष्ट्रध्वज फडकाविणे आणि लोकशाही अधिकाराची मागणी करणे अशा विविध मार्गांने निजामशाही विरुद्ध आवाज उठविला होता. निजाम सरकारने त्यांना अटक करून कारावासात ठेवले होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सुमारे दीड वर्ष कारावास भोगला. त्यांच्या त्याग, धैर्य आणि देशप्रेमाची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड, गुणवत्तेची जिद्द आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी प्रल्हाद काका कोल्हे, सतीश कोल्हे, सत्तू आण्णा कोल्हे, सवाराम कोल्हे, नारायण कोल्हे, कृष्णा कोल्हे, प्रल्हाद कोल्हे, विष्णुपंत कोल्हे, अविनाश कोल्हे, विलास कोल्हे, परमेश्वर कोल्हे, सुनील कोल्हे, बाळासाहेब कोल्हे, कैलास कोल्हे, अनिल कोल्हे, विनोद खंडागळे, दत्ता पाटील कोल्हे, गणेश कोल्हे, इंद्रराव कोल्हे, सचिन कोल्हे आदींसह ग्रामस्थ, पालक, शिक्षक, विद्यार्थी व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

### 'आत्महत्या करणारा शेतकरी पंचांग पाहत

नाहीत, असा आरोप त्यांनी केला. दरम्यान, आमदार अंबादास दानवे यांनी शेतीसाठीच्या वीजपुरवठ्याच्या मुद्द्यावरून सरकारला लक्ष्य केले. शेतीला आठ तास वीजपुरवठा देण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये आपत्कालीन लोडशेडिंग सुरू झाले असून, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दोन तासदेखील पुरेशी वीज मिळत नसल्याची स्थिती आहे, असा दावा दानवे यांनी केला. पावसाने ओढ दिल्याने खरीप पिके संकटात असताना पंचनामे, वीजपुरवठा, दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या प्रश्नांवरून ठाकरे गटाने सरकारला घेरल्याने मराठवाड्यातील आंदोलनातून सरकारविरोधातील आक्रमक भूमिका पुन्हा अधोरेखित झाली.

-----------

### लवकरच बीड ते पनवेल ही

या लोकप्रतिनिधींससह प्रशासकीय पातळीवर उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे प्रामुख्याने उपस्थित होते. बीड जिल्हा अनेक दशके रेल्वे नकाशापासून दूर असल्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून आज सुरू झालेल्या या थेट रेल्वेसेवेमुळे बीडकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे.याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्वप्नांना उजाळा दिला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी रेल्वे जोडणीला नेहमीच प्राधान्य दिले होते. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरू करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून मला विशेष अभिमान वाटत आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, येत्या काही महिन्यांत बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा सुरू करण्याचा मानस व्यक्त करत, बीड-परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल आणि त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. रेल्वेच्या शुभारंभासोबतच बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ आज रोवली गेली.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी प्रशासकीय पातळीवर मंजूर करण्यात आला यासोबतच, धानोरा रस्त्यावरील ''पंढरी'' येथे सुमारे २८ कोटी रुपये खर्चाचे भव्य तारांगण व विज्ञान उद्यान उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत १४ कोटी रुपयांना मंजुरी मिळाली असून, या ठिकाणी विद्यार्थ्यांना मातृभाषेतून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आभासी तंत्रज्ञान आणि खगोलशास्त्राची सविस्तर माहिती उपलब्ध होणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हैदराबाद मुक्ती संग्रामात हौतात्म्य पत्करलेल्या व तुरुंगवास भोगलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र आदरांजली वाहिली. तसेच, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने त्यांनाही मंचावरून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले तर विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा, तसेच खासदार बजरंग सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

------------------

### नो इन्शुरन्स ना

सल्लामसलतीने वैध वाहन विम्याची स्थिती आणि इंधन पुरवठा यांचा संबंध जोडणारी प्रायोगिक व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश दिले होते. या यंत्रणेत एएनपीआर कॅमे-यांच्या मदतीने विमा नसलेली किंवा नोंदणी नसलेली वाहने ओळखली जाऊ शकतात. त्यानंतर संबंधित वाहनमालकाला अनिवार्य विमा काढण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिल्लीपासून या प्रकल्पाची सुरुवात करून त्यासाठीची रूपरेषा आणि कालमर्यादा सादर करण्यास सांगितले होते.वाहन क्रमांकावरून विम्याची स्थिती रिअल-टाइममध्ये तपासता यावी, अशी तंत्रज्ञान आणि डेटा प्रणाली तयार करणे हे आयआरडीएआयसमोरचे मुख्य आव्हान आहे. आयआयबीकडे विम्याची माहिती असते, तर वाहनकडे वाहनांची नोंदणी माहिती असते. एएनपीआर कॅमे-यांनी टिपलेला वाहन क्रमांक हा कॉमन आयडेंटिफायर म्हणून वापरला जाईल. आयआरडीएआयने यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते की, महामार्ग, टोल नाके आणि शहरातील रस्त्यांवर बसवलेल्या एएनपीआर कॅमे-यांच्या माध्यमातून विमा नसलेली वाहने ओळखता येतील.

-------------

### पुन्हा मागणी पुन्हा आश्वासन

माझे काम मराठा समाजासाठी लढण्याचे आहे ते मी करत आहे. मी केवळ समाजासाठी लढू शकतो. ते काम करतो आहे. सरकारची मस्ती मोडणे गरजेचे होते ते आम्ही केले. सरकारला समाजापुढे वाकायला लावले, असे जरांगे यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांची सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सरकारच्या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दादा भुसे, आमदार प्रसाद लाड आणि आमदार सुरेश धस यांचा समावेश होता.यापुढे काही दगाफटका किंवा धोका झाला, तर उपोषण करणार नाही; थेट मुंबईवर धडकणार, असा इशारा जरांगे पाटील यांनी या वेळी दिला. तसेच, मुंबईत जवळपास १ लाख तरुण गेले आहेत, त्यांनी आता गणपतीचे दर्शन घेऊन माघारी यावे. सरकारला ३ महिन्यांचा वेळ दिला म्हणजे आंदोलन संपले असे होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.यापुढे मनोज जरांगे पाटील यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही; देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आहेत, असे वक्तव्य शिष्टमंडळाकडून करण्यात आले.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ५८ लाख नोंदी कमी होणार नाहीत, याची सरकारने खात्री द्यावी. या नोंदी शोधण्यासाठी आम्ही स्वत: माणसे देतो. शिंदे समिती काम करत नाही आणि सरकारही याकडे लक्ष देत नाही. हे आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. आम्हाला आश्वासन दिले, तरी आंदोलन सुरूच राहणार आहे. मराठा समाजाशी खुन्नस ठेवणे योग्य नाही. राधाकृष्ण विखे पाटील चुकतात, तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही आपण प्रेम करू. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी. ५८ लाख नोंदींमधील एकही नोंद कमी व्हायला नकोनोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली.आंदोलन मागे घेतल्यानंतर मनोज जरंगे थेट छत्रपती संभाजीनगकडे निघून गेले गेल्या काही दिवसापासून त्यांचे उपोषण सुरु असल्याने प्रकृती ठीक नसल्याने उपचारासाठी गेले.

----------------

### दुष्काळ जाहीर करावा ही गरज, तो

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती असून दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही दत्तात्रय भरणेंनी उत्तर दिले. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून याबाबत माहिती घेतली जाईल. दुष्काळ जाहीर करावा, ही आजची गरज असून तो आपोपआच जाहीर होईल, हे सांगायची गरज नाही. राज्यातला शेतकरी अडचणीत आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याचा आढावा घेतला आहे, अशी माहिती कृषीमंत्र्यांनी दिली. मी स्वत: पाच-सहा जिल्ह्यांचा दौरा करणार आहे, संपूर्ण माहिती घेणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना नक्कीच शासनातर्फे सहकार्य केले जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. चारा छावण्याबाबतही विचार केला जाईल, पशुधन आणि दुग्ध व्यवसायाचा निर्णय दिवाळीच्या आसपास घेतला जाईल, असेही भरणेंनी सांगितले. राज्यात ५६ लाख शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा फायदा होणार आहे. साधारणत: ४० हजार ८८५ कोटी रुपये रक्कम यासाठी लागणार आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदानही देण्यात येईल. मात्र, टप्प्या-टप्प्याने प्रक्रिया सुरू होऊन ५० हजारांच्या कर्जमाफीसह लवकरात लवकरच शासनाकडून निर्णय होणार आहे, अशी माहितीही दत्तात्रय भरणेंनी दिली.

-----------

### मराठवाड्यासाठी कोकणातून ७० टीएमसी

संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे सात वर्षांचा कालावधी लागणार असला, तरी त्याआधीच टप्प्याटप्प्याने मराठवाड्यात पाणी पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच कृष्णा खोऱ्यातील पाणी 'फ्लड मिटिगेशन'च्या माध्यमातून भीमा खोऱ्यातून मराठवाड्यात आणण्यासाठीच्या प्रकल्पालाही राज्य सरकारने मान्यता दिल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. या प्रकल्पाचे पहिले टेंडर निघाले असून उर्वरित टेंडरची प्रक्रिया सुरू आहे. या माध्यमातून जवळपास ३० टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार असून बीड, धाराशिव आणि लातूरच्या भागापर्यंत हे पाणी पोहोचवण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला आहे, मात्र पुढच्या पिढीला दुष्काळ पाहावा लागू नये, यासाठी सरकार वेगाने काम करत आहे. मराठवाडा गोदावरी खोऱ्यात येतो आणि हे खोरे पाण्याच्या दृष्टीने तुटीचे असल्यानं या भागात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं. राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड घेतल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. सुरुवातीच्या काळात चांगला पाऊस झाल्याने यंदा पिके चांगली येतील, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र त्यानंतरच्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढल्याचं मुख्यमंत्र्यांनी प्रतिपादन केले. यावेळी राज्य सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील आणि शेतकऱ्यांना मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. एनडीआरएफच्या नियमानुसार ५ ऑक्टोबरनंतर पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात येणार आहेत. मात्र त्याआधीपासूनच सरकारने तयारी सुरू केली आहे. ५ ऑक्टोबरनंतर पंचनामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. एनडीआरएफच्या माध्यमातून मिळणारी मदत मिळेलच, पण त्याआधीही राज्य सरकारकडून शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवली जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

--------------

### उच्च न्यायालयात देशातील

मध्ये राजस्थान उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, तब्बल २२ वर्षे उलटूनही या याचिकेवर सुनावणी झालेली नाही. या प्रकरणात लवकर सुनावणी घेण्याची मागणी करणारी याचिका या आरोग्य कर्मचा-याने बुधवारी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर केली.उच्च न्यायालयांना घटनात्मकदृष्टया स्वतंत्र दर्जा असल्याने आणि प्रत्येक न्यायाधीशासमोरील दररोजच्या मोठ्या संख्येने असलेल्या प्रकरणांचा विचार करता, सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने नेहमीचा आदेश देत याचिका स्वीकारण्यास नकार दिला. मात्र, संबंधित याचिकेच्या लवकर सुनावणीसाठी अर्ज करण्याची मुभा याचिकाकर्त्याला देण्यात आली. उच्च न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणांमध्ये अलाहाबाद उच्च न्यायालय आणि राजस्थान उच्च न्यायालय आघाडीवर आहेत.अलाहाबाद उच्च न्यायालयात सुमारे १२.५ लाख, तर राजस्थान उच्च न्यायालयात ७ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. या दोन्ही उच्च न्यायालयांमधून लवकर सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयात मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होत आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रत्येक न्यायाधीश किंवा खंडपीठ दररोज सरासरी १५० ते २०० प्रकरणे सुनावणीसाठी घेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, प्रलंबित प्रकरणांची प्रचंड संख्या न्यायालयाच्या निर्णयक्षमतेवर मोठा ताण आणत असल्याचे चित्र आहे.

-----------

### दुश्मनी परळीत अन

शस्त्र, लाठी-काठ्या आणि दगडाने हल्ला केला. यात बाबा शेख जागीच ठार झाले तर त्याचे तिघे साथीदार जखमी झाले . पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, परळीतील रहिवासी बाबा शेख आणि त्याचे ३ साथीदार बुधवारी बिदरला आपल्या खाजगी कामानिमित्त निघाले होते. रात्रीच्या वेळी ते लातूर येथील उस्मानपुरा भागातील हॉटेल अमिर येथे जेवणासाठी थांबले होते. काही वेळातच परळी येथील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नगरसेवक अल्ताफ शेख आणि त्याचे साथीदार तेथे आले आणि हॉटेलमध्ये समोरासमोरच जेवणासाठी बसले. त्याचवेळी त्यांच्यात कोणत्या तरी कारणावरून बाचाबाची झाली. त्यावेळी हॉटेलमध्येच गोंधळ सुरू झाला. त्यावेळी हॉटेलमालकाने वादावादी करणा-या दोन्ही गटांना हॉटेलबाहेर काढले. हॉटेलबाहेर येताच नगरसेवक अल्ताफ शेख आणि त्याच्या साथीदारांनी आपल्या चारचाकी गाडीमधून धारदार शस्त्र आणि लाठी-काठ्या बाहेर काढल्या आणि काही जणांनी दगड, विटा फेकून मारत जोरदार हल्ला केला. त्याचवेळी अल्ताफ शेखने बाबा शेख याच्यावर सपासप वार केले. यात बाबा शेख जागीच ठार झाला तर तिघे जण जखमी झाले. त्यानंतर हल्लेखोर तेथून फरार झाले. ही घटना बुधवारी रात्री ११ च्या सुमारास घडली.दरम्यान, बाबा शेख आणि त्याच्या जखमी साथीदारांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉक्टरांनी तपासणी केली असता बाबा शेख याचा मृत्यू झाल्याचे सांगितले तर अन्य तिघे जण जखमी असून, त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या घटनेचे वृत्त समजताच पोलिसही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी यासंबंधीची माहिती घेतली. या घटनेचा पंचनामा र३ात्री उशिरापर्यंत सुरू होता. प्राथमिक माहितीनुसार जुन्या वादातून३च हा प्रकार घडल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. पोलिस अधिक चौकशी करीत आहेत.

cmyk



## मोठेवाडी येथील जि.प.शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वल्लभभाई पटेल व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पुजन करून मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नाथा रासवे हे होते तर सरपंच सत्यभामा दळवी,माजी सरपंच अविनाश गोंडे,ग्रामसेवक जितेंद्र इंगोले,उपाध्यक्ष विलास खेत्री, उपसरपंच अंगद खेत्री, चेअरमन संभाजी चव्हाण, भारत खेत्री, ज्ञानेश्वर खेत्री, संभाजी पास्टे, सुदर्शन हिवरकर,माणीक आप्पा औटे,भारत पास्टे, गजानन गोंडे,गणेश सर्जे, यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी भाषन, देशभक्ती पर गीत गायन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सतीश डोणे यांनी केले तर प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापक तुकाराम शिंदे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक उत्तम ढवळे, गेना पवार, प्रल्हाद दळवी, वसंत टाकानखार,शिवाजी व्यवहारे, शिक्षिका मनीषा गुळवे,रूपाली बडवे,आम्रपाली भालेराव यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी, पालक, अंगणवाडीताई, शिक्षण प्रेमी व गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## जवळा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर, ८५ नागरिकांनी घेतला लाभ

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथे जय भवानी सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने गुरुवारी (दि. १७) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात गावातील ८५ नागरिकांनी सहभाग घेत आरोग्य तपासणी करून घेतली. आयुर्वेदिक वैद्य गणेश मस्के यांनी नागरिकांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी केली. तपासणीनंतर आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांनी आपल्या आरोग्याची नियमित काळजी घ्यावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. जय भवानी सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये आरोग्य शिबिर, रांगोळी स्पर्धा आदी उपक्रमांचा समावेश आहे. यंदाच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# व्याजाच्या पैशांच्या वसुलीसाठी मारहाण अन् धमकी; शेतकऱ्याचा विष प्राशनाने मृत्यू

### मारहाण, शिवीगाळ व जिवे मारण्याच्या धमकीचा आरोप; चौघांविरुद्ध पोलिसांत तक्रार

आष्टी । प्रतिनिधी

व्याजाने घेतलेल्या पैशांच्या वसुलीवरून मारहाण, शिवीगाळ आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप असलेल्या धामणगाव येथील ४२ वर्षीय शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अशोक लक्ष्मण लोखंडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी त्यांच्या पत्नी अश्विनी अशोक लोखंडे यांनी आष्टी पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीनुसार, ६ सप्टेंबर रोजी अशोक लोखंडे गावात गेले होते. दुपारी घरी परतल्यानंतर त्यांनी बबन सोनबा लोखंडे व राहुल बबन लोखंडे यांनी व्याजाने घेतलेल्या पैशांच्या कारणावरून गावात शिवीगाळ व धक्काबुक्की करत मारहाण केल्याचे पत्नीला सांगितले. तसेच पैसे संध्याकाळपर्यंत न दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही त्यांनी सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

यानंतर अशोक लोखंडे हे नागतळा येथे विष्णु मारुती सोनवणे व राजेंद्र रामचंद्र गोरे यांच्याकडे उसने दिलेले पैसे मागण्यासाठी गेले. सायंकाळी त्यांनी पत्नीला फोन करून पैसे मागितल्यावर संबंधित दोघांनी शिवीगाळ करत चापट व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले. त्याच फोनवर आपण विष प्राशन करीत असल्याचे सांगून त्यांनी फोन बंद केल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी नागतळा परिसरात शोध घेतला असता काळा चबुतरा-पाटसरा रस्त्यावर अशोक लोखंडे हे विषारी औषध प्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांना तातडीने आष्टी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी श्रीसाई हॉस्पिटल, आष्टी येथे हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच ११ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे धामणगाव परिसरात खळबळ उडाली असून, मारहाण, मानसिक त्रास आणि धमक्यांना कंटाळून अशोक लोखंडे यांनी आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या पत्नीने फिर्यादीत केला आहे. या फिर्यादीवरून बबन सोनबा लोखंडे, राहुल बबन लोखंडे, विष्णु मारुती सोनवणे आणि राजेंद्र रामचंद्र गोरे यांच्याविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासण्याचे काम पोलिसांकडून सुरू असून, घटनेमागील नेमकी पार्श्वभूमी आणि जबाबदार व्यक्तींबाबतचा तपास पोलिसांच्या पुढील कारवाईनंतर स्पष्ट होणार आहे. प्रकरणाचा पुढील तपास आष्टी पोलिस करीत आहेत.

## नदीजोड प्रकल्पाची तात्काळ अंमलबजावणी करून १५८ टी.एम.सी. पाणी मराठवाड्याला द्या -प्रा.सुशीला मोराळे

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात सामील झालेला मराठवाडा कायम दुर्लक्षित असून दुष्काळग्रस्त व अवर्षणप्रवण म्हणून ओळखला जातो. जवळपास ७० % क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे. सिंचन आयोगाच्या मापदंडानुसार मराठवाड्यात २६० टीएमसी पाणी तुट निर्माण झाली आहे. सिंचना बरोबरच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न जटिल बनवत आहे. लातूरला रेल्वेने पाण्याची टँकर आणावे लागले. गोदावरी प्रकल्प अंतर्गत उपसा जलसिंचन योजना वेगवेगळी कारणे सांगून पुढे ढकलण्यात आली. मराठवाड्यात अपुरे सिंचन वाढत असलेला अनुशेष प्रशासनाची व राजकारणाची आनस्ता यामुळे अनुशेष वाढत आहे. जिरायत शेती बेभरवशाचा पाऊस यामुळे मराठवाड्यात शेतकरी शेती सोडून स्थलांतर करीत आहेत. गोदावरी खोरे हे तुटीचे खोरे आहे असे लवादाने जाहीर केले आहे. पश्चिम वाहिनी नद्याचे समुद्रात जाणारे पाणी आडून मराठवाड्याला देण्यात यावे. कृष्णा खोऱ्याचे माननीय विलासरावजी देशमुख साहेब यांनी मंजूर केलेले २५ टीएमसी पाणी बीड जिल्ह्याला देण्यात यावे तसेच धाराशिव लातूर ला ३० टीएमसी पाणी देण्यात यावे या मागण्यासाठी दिनांक १५ , १६, १७ सप्टेंबर पासून मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समिती व पाणी हक्क संघर्ष समितीच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथे डॉक्टर आण्णासाहेब शिंदे, विजय गव्हाणे, प्रा. सुशीला मोराळे यांच्या नेतृत्वात कमिशनर कार्यालय येथे धन्य आंदोलन सुरू आहे या आंदोलनात मराठवाड्यातील शेतकरी कष्टकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

दिनांक १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती संभाजी नगर येथे येत आहेत. बीड जिल्ह्यात मराठवाड्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी हे धरणे सुरू आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय स्वतः सतत बोलत आहेत मी मराठवाड्यातील पुढच्या पिढ्यांना दुष्काळ बघू देणार नाही परंतु कृती मात्र ते करीत नाहीत. योजना मंजूर करतात मात्र बजेटची तरतूद होत नाही. तिरंगा रॅलीसाठी मुख्यमंत्री छत्रपती संभाजी नगरला आले म्हणाले मराठवाड्याचा पाणी प्रश्नाला प्राधान्य देऊन आणि परत मुंबईला गेले मंत्रिमंडळ बैठकीत पश्चिम महाराष्ट्राच्या कुकडी धरणाला ५ हजार कोटी दिले. मराठवाड्याची उपेक्षाच होत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील निळवंडे धरणाला चार कालवे काढले जातात मात्र मराठवाड्यासाठी कालव्याचा निकष लावला जातो. ३१ मार्च २०३१ पर्यंत नदीजोड प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. पाणी फक्त शेतीसाठीच नाही तर एमआयडीसीसाठी जिवंत ठेवायचे असतील तर पाण्याशिवाय पर्याय नाही संभाजी नगरच्या ३५००० लहान मोठ्या कंपन्या सध्या बंद पडलेल्या आहेत. आमचे गोदावरीचे ३०० टीएमसी पाणी आंध्रामध्ये वाहून जाते हे मराठवाड्यासाठी अडवले तर इथला पाणी प्रश्न सुटू शकेल.

## पान ६ वरून...

### नगरपालिकेचा ‘तुम्हारे खत

या कार्यक्रमात खा. बजरंग सोनवणे यांना भाषणाची संधी मिळाल्याने त्यांनी रेल्वे आंदोलनाचा इतिहास सांगितला. यावेळी ज्येष्ठ संपादक नामदेवराव क्षीरसागर आणि युवा कार्यकर्ते अमोल गलधर यांचा आवर्जून उल्लेख केला. मात्र या रेल्वेच्या कामासाठी ज्या खासदारांनी वारंवार पाठपुरावा केला त्या माजी खासदार स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर यांचा उल्लेख करण्याचे खा. सोनवणे यांनी सोयीस्करपणे टाळले. याचा विसर व्यासपीठावरील नेत्यांनाही पडला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी काकूंचा आवर्जून उल्लेख करणे गरजेचे असतानाही त्यांनीही तो केला नाही. वास्तविक पाहता मराठवाड्याच्या कन्या असलेल्या सुनेत्रा ताईंना हा इतिहास माहीत असावा. मात्र त्यांनीही स्वर्गीय काकूंचा उल्लेख टाळला. बीडच्या रेल्वेच्या मागणीसाठी स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर यांचे मोठे योगदान असले तरी त्यांचा उल्लेख या व्यासपीठावरून होणे गरजेचे असतानाही तो झाला नाही. हा स्वर्गीय काकुंना मानणाऱ्या बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचा अवमान असल्याचे बोलले जात आहे. याचा जिल्ह्यात अनेकांनी निषेधही केला. या व्यासपीठावरूनच बीड नगरपालिकेच्या तारांगण आणि नाट्यगृह सुशोभीकरणाचा शुभारंभ झाला वास्तविक पाहता हा कार्यक्रम रेल्वे बोर्डाचा होता. या ठिकाणी फक्त रेल्वेचाच विषय व्हायला हवा होता. मात्र नगरपालिकेच्या प्रशासनाने आणि पदाधिकाऱ्यांनी तुम्हारे खत मे हमारा सलाम या म्हणीप्रमाणे आपल्याही कामाचा शुभारंभ करून घेतला. यावेळी नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात पत्रकार कक्षात घुसखोरी केली. त्यामुळे पत्रकारांना बसायला जागा राहिली नाही. शेवटी जिल्हाधिकाऱ्यांना खाली यावे लागले. पत्रकारांसाठी कक्ष दिल्यानंतर इतरांनी त्या ठिकाणी जाऊ नये असे साधे मॅनर्स या लोकांना राहिले नाही. त्यामुळे पत्रकारातूनही संताप व्यक्त केला जात आहे.

### आ.सुरेश धस यांनी

यांनी केली. सीना-म्हेकरी प्रकल्पातील पाण्याचा अनधिकृत उपसा रोखावा, अतिशोषित गावांतील सिंचनावरील निर्बंधांबाबत शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक बळ देऊन शेतकऱ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून द्यावे, तसेच शेतकऱ्यांच्या सोयीच्या वेळेनुसार लोडशेडिंगमध्ये बदल करावा, अशी मागणीही त्यांनी केली. बैठकीस पालक सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

### मोठेवाडी ग्रामपंचायत

अविनाश गोंडे, उपसरपंच अंगद खेत्री,ज्ञानेश्वर खेत्री,विलास खेत्री,चेअरमन संभाजी चव्हाण,भारत खेत्री, संभाजी पास्टे,सुदर्शन हिवरकर,भारत पास्टे, गणेश सर्जे, प्रकाश शेळके,शिक्षक एस.व्ही.डोणे,गेणा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.तर गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### आष्टी तालुक्यात अवैध

असल्याची चर्चा असून, त्याबाबतही नागरिकांमध्ये नाराजी आहे. अवैध धंद्यांपासून तरुणांना दूर ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

‘कारवाई कागदावर नको, परिणाम दिसायला हवा’

अवैध दारू, गांजा आणि मटका यांसारख्या प्रकारांमुळे सामाजिक वातावरणावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने संबंधित यंत्रणांनी केवळ तक्रारींची दखल न घेता प्रत्यक्षात प्रभावी कारवाई करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. अवैध धंद्यांना कोणाचेही पाठबळ मिळत असल्यास त्याचीही चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे. तरुणाईला व्यसनमुक्त ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी या तिन्ही पातळ्यांवर प्रशासनाने काम करण्याची गरज निर्माण झाली आहे. आता आष्टी तालुक्यातील अवैध धंद्यांवर नव्याने रुजू झालेले पांढरे तालुका पोलिस निरीक्षक काय ठोस भूमिका घेतायत याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### शेतातील पिकाला पाणी

बीडला हलवण्याचे सांगितले जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मयत म्हणून घोषित केले. मयत मोरेश्वर गोंडे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व अवघ्या एक वर्षाचा मुलगा असा परिवार असून मयताच्या मृतदेहावर जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे.चिंचोटी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शेतकऱ्यांना पुन्हा उभं करण्यासाठी

चित्र आहे. तसेच सणांच्या काळात ग्रामीण भागातील नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत असल्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक तालुक्यातील बुडीत क्षेत्रातील दहा सार्वजनिक विहिरींचा समावेश टंचाई आराखड्यात करावा. वाडी, वस्ती आणि तांड्यांवरील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी नव्याने हातपंप उपलब्ध करून देण्याची तरतूदही टंचाई आराखड्यात करण्यात यावी. सध्याची परिस्थिती लक्षात घेता शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेऊन प्रभावी कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आ.प्रकाश सोळंके यांनी बैठकीत केली.

### युवा शेतकरी संघर्ष

शेतकरी युवा संघर्ष समितीच्या जगदीश फडतारे, अर्जुन नाईकनवरे, राजेश नाईकनवरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी घेतला असून ते माजलगाव धरणाच्या जलाशयात जलसमाधी आंदोलनात उतरले आहेत.

आंदोलनकर्त्यांनी या जलसमाधी आंदोलनात अनेक महिला येणार असल्याचे सांगितले होते; मात्र कोणतीच महिला या आंदोलनात आली नाही.पण भारतीय जनता पार्टीच्या महिला मंडळधिकारी तथा राजेगावच्या माजी सरपंच रूपालीताई कचरे यांनी कमालीचा संयम व भीती न बाळगता आंदोलनकर्त्या सोबत जलसमाधी आंदोलनात पाण्यात प्रवेश केला.महसूल प्रशासनाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी आंदोलन स्थळी उपस्थित नव्हता. आंदोलनस्थळी धरण परिसरात जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता आदमानकर, उपविभागीय अभियंता तिडके, उपविभागीय अभियंता शितल माने यांची धरण परिसरात उपस्थित होती.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक ह भ प मसुराम तात्या कदम महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाले, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक नामदेवराव वाघ, रंजित बापू कदम हे होते. यावेळी व्यासपीठावर दत्तात्रय चव्हाण, आत्माराम वाव्हळ, श्रीमती फाटे मॅडम हे उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमापूजनानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शाळेतील विद्यार्थीनी कु. तसबीया शेख हिने देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्या नंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर मोलाचा संदेश दिला. यावेळी बोलताना ह भ प मसराम तात्या कदम महाराज यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमाचाअध्यक्षीय समारोप करताना श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा, क्रांतिवीरांनी केलेल्या चळवळी विद्यार्थ्यांना सांगितल्या तसेच यावेळी त्यांनी देशसेवेचा व शिक्षणाचा वसा पुढे नेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाव्हळ सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मोगरा जिल्हा परिषद शाळेत मराठवाडा मुक्तीदिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त दि १७ सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोगरा येथे शाळेच्या मैदानावर ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांना विशेष बक्षिसांचे वितरण करण्यात आले तसेच कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुधाकर गोसावी होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच ज्ञानदेव राठोड, पोलीस पाटील कैलास मानधने, ॲड.बाबुलाल घनघाव,ग्राम विस्तार अधिकारी टकले,प्रशासक बोरके,विकास झेटे,नवनाथ इंगळे,रत्नाकर जोशी,शाहू घनघाव,कचरू झेटे,रामू ठोंबरे, शेषेराव शिंदे, तुकाराम राठोड, अंगणवाडी सेविका तसेच गणेश मंडळाचे अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते.मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधून शाळेत खगोल भौतिकशास्त्र प्रयोगशाळेची घोषणा करण्यात आली. संभाजीनगर येथील आमोल कुलकर्णी यांच्या सहकार्याने हा अभिनव उपक्रम साकारण्याचा संकल्प करण्यात आला आहे.या खगोल भौतिकशास्त्र लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रह, तारे,आकाशगंगा आणि अवकाशातील विविध खगोलीय घटनांचे निरीक्षण व अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, खगोलशास्त्र आणि संशोधनाची आवड निर्माण व्हावी,त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळावी आणि भविष्यातील वैज्ञानिक घडावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाच्या क्षेत्रात नवे क्षितिज खुले करणारा हा उपक्रम मराठवाडयात पहिला प्रयोग आसून निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सुभाष घनघाव, सहशिक्षक हानुमंत पांढरपोटे, अविनाश पोळ, सोनसळे,गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गुरुकृपात भव्य राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात पार

माजलगाव । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देत त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना राज्यस्तरीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव यांच्या वतीने आयोजित सहावी राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन ( भित्तीपत्रक सादरीकरण ) स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. प्रकाश राजेभोसले आणि सौ. नंदिनी राजेभोसले यांच्या शुभ आशीर्वादाने रिबीन कापून झाले. महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी ९४ संघाच्या माध्यमातून या स्पर्धेत सहभाग घेत विविध वैज्ञानिक व संशोधनात्मक विषयांवरील पोस्टर्स प्रभावीपणे सादर केली.




‘पोस्टर’मधून दिसली भविष्यातील फार्मसीची दिशा!

बक्षीस वितरण समारंभात फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अमित बिंदू यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. तसेच या कार्यक्रमास डॉ . रंगनाथ गोळेकर, पत्रकार श्री. पांडुरंग उगले यांची प्रमुख उपस्थित लाभली. गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी लोखंडे आणि शितल गोपाळघरे या विद्यार्थिनींनी केले व आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले. या स्पर्धेत बी.फार्मसी गटात के. टी. पाटील कॉलेज, धाराशिव येथील श्रद्धा साळगरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव येथील सानिया पठाण हिने द्वितीय क्रमांक मिळवून गौरव वाढविला. तर डीजेपीएस कॉलेज, पाथरी येथील वैष्णवी काळे व सोनाली वाघमारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे ७०००, ५०००, ३००० रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. तसेच डी.फार्मसी गटात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील शेख सानिया व शेख तस्मिया यांनी प्रथम क्रमांक मिळविला. चन्नबसवेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील पटेल शिफा व वैभवी धनश्री यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच आदित्य डिप्लोमा फार्मसी कॉलेज, बीड येथील गजानन गोरे व लबासे भागवत यांनी तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे ५०००, ३०००, २००० रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना संशोधन, वैज्ञानिक विचारसरणी, सादरीकरण कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ मिळाले. विशेषतः माजलगावसारख्या शहरात राज्यस्तरीय फार्मसी उपक्रमाचे आयोजन झाल्याने शैक्षणिक क्षेत्रातून गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फार्मसी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामातील शूरवीरांना अभिवादन; नगर परिषदेत शरद यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त गुरुवार,दि.१७ सप्टेंबर रोजी माजलगाव नगर परिषद येथे नगरसेवक शरद यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भारताचा तिरंगा डौलाने फडकवत मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या शूर स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात आले.




जुलमी राजवटीविरोधात मराठवाड्याच्या मुक्तीसाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष, त्याग आणि बलिदान हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अभिमानास्पद अध्याय आहे. लोकशाही, स्वातंत्र्य आणि जनतेच्या हक्कांसाठी लढलेल्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील,असे यावेळी सांगण्यात आले.या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, मुख्याधिकारी विशाल बालवाडकर,सर्व नगरसेवक तसेच नगर परिषद कर्मचारी बांधव उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर उपस्थित मान्यवरांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्मे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाची जाणीव ठेवून लोकशाही मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# महाराष्ट्रात शेतकऱ्यांना मोठी बाजारपेठ मिळणार

## मॅग्नेट २.० मुळे आधुनिक कृषी पायाभूत सुविधांना गती मिळेल

मुंबई : मुंबईत 'मॅग्नेट कृषी व्यवसाय गुंतवणूकदार मेळावा' आयोजित करण्यात आला होता. आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) सहाय्याने, हब-अँड-स्पोक मॉडेलवर कृषी पायाभूत सुविधा विकसित करून गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जाईल.

महाराष्ट्राच्या कृषी व्यवसाय क्षेत्रात आधुनिक पायाभूत सुविधा आणि खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मंगळवारी मुंबईत 'मॅग्नेट कृषी व्यवसाय पायाभूत सुविधा गुंतवणूकदार मेळावा' आयोजित करण्यात आला होता. उद्योगमंत्री आणि महाराष्ट्र राज्य कृषी विपणन मंडळाचे अध्यक्ष, जयकुमार रावल यांनी आशा व्यक्त केली की, या उपक्रमामुळे राज्याच्या कृषी क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील. जयकुमार रावल यांच्या मते, दर्जेदार प्रक्रिया सुविधा आणि आधुनिक कृषी व्यवसाय पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध



करून देणे हे मॅग्नेट २.० प्रकल्पाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने, महाराष्ट्र कृषी-व्यवसाय नेटवर्क च्या माध्यमातून फळे, हळद, आले आणि फणस यांसारख्या कृषी उत्पादनांसाठी उत्पादनापासून ते प्रक्रिया आणि निर्यातीपर्यंत एक एकात्मिक मूल्य साखळी विकसित केली जात आहे. मॅग्नेट २.० अंतर्गत, महाराष्ट्र राज्यात हब-अँड-स्पोक मॉडेलवर आधारित कृषी-व्यवसाय पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील. ही प्रणाली कृषी उत्पादनांचे संकलन, प्रक्रिया आणि विपणन सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न करेल. यामुळे पिकांची नासाडी कमी होण्याची आणि शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग व निर्यातदारांशी जोडण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

संपूर्ण मूल्य साखळी मजबूत करण्यामध्ये कृषी उत्पादनांसाठी एक चांगली बाजारपेठ प्रणाली विकसित करण्यावरही लक्ष केंद्रित केले जाईल. गुंतवणूकदार परिषदेला कृषी-व्यवसाय, अन्न प्रक्रिया, बँकिंग, लॉजिस्टिक्स आणि स्टार्टअप क्षेत्रांतील २०० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

## जनावरांमधील घटसर्प आजाराची लक्षणे आणि उपाय



वातावरणातील बदलाचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर पाहायला मिळतो. पावसाळ्यात घटसर्प ह्या रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. त्यालाच हेमोरॅजिक सेप्टिसिमिया असेही म्हणतात. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे वेळीच लसीकणरण करुन घेणे गरजेचे आहे.या रोगाची लक्षणे विशेषत: गाई आणि म्हशीमध्ये आढळतात. हा संसर्गजन्य आजार असल्याने लवकर पसरतो.

रोगाचा प्रादुर्भाव कशा प्रकारे होतो : पाणी साचलेल्या,जनावरांचा गोठा अस्वच्छ असलेल्या किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांना या आजाराचा संसर्ग होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे इतर जनावरांनी सेवन केल्यास किंवा संपर्कात आली तर हा आजार होतोच. तसेच गाईच्या दुधानेही घटसर्प रोगाचा प्रसार होतो.

घटसर्प रोगाची लक्षणे : जनावरांना तीव्र ताप येतो, जवळपास १०५ ते १०६ डिग्री फॅ. ताप जावु शकतो जनावरांचे डोळे लाल आणि सुजलेले दिसायला लागतात.

- नाक,डोळे आणि तोंडातूनस्त्राव होतो. मान,डोके आणि पायांना सूज येते. श्वास घेण्यास त्रास झाल्याने गुदमरून प्राण्याचा मृत्यू होवु शकतो .

संसर्ग झालेल्या प्राण्यांची काळजी कशी घ्याल : या आजारामध्ये जनावरांना अधिक प्रमाणात ताप येतो. श्वास घेण्यास त्रास होवून घशा भोवती सूज येवून जनावरे मृत्युमुखी देखील पडतात. जनावरांच्या शरीरामध्ये घटसर्पाचे जंतू असतात, परंतू वातावरणात झालेला बदलांमुळे व उन्हाळ्यात पौष्टिक चारा न मिळाल्याने शरीरावर ताण येऊन जनावरांची प्रतिकारशक्ती कमी होवु लागते.या आजारावर त्वरित उपचार करणे आवश्यक आहे.घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य तो सल्ला घ्यावा. दरवर्षी मान्सूनपूर्व या आजाराची लस पशुवैद्यक संस्थेकडून घेणे आवश्यक आहे.त्याचबरोबर हे लसीकरण पावसळ्यापूर्वी करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच संसर्ग झालेल्या प्राण्याला इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे.तसेच संसर्ग झालेल्या प्राण्याला नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नये.

## रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन

खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते..

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर




३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल.गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०- १०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

## गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत.

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत. गाईच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे म्हशीचे दूध गाईच्या दुधापेक्षा जाड असते. म्हशीची मुऱ्हा ही जात जास्त दूध देणारी जात मानली जाते. देशातील मोठ्या संख्येने पशुपालक ते पाळतात आणि चांगला नफाही मिळवतात. याशिवाय या म्हशीची दूध देण्याची क्षमताही इतर जातींपेक्षा जास्त आहे. मुर्रा जातीच्या म्हशीचा रंग काळा असतो. याशिवाय त्याची शिंगेही वक्र असतात. मुर्राह म्हशीचे डोके लहान आणि लांब शेपूट असते. तसेच त्याचा मागील भाग चांगला विकसित झाला आहे. या म्हशीच्या डोक्यावर, शेपटीवर आणि पायावरही सोनेरी रंगाचे




केस आढळतात. मुऱ्हा म्हशीचा गर्भधारणा कालावधी सुमारे ३१० दिवसांचा असतो. त्याची नीट काळजी घेतल्यास ही म्हैस दररोज २० ते ३० लिटर दूध देते. पशुपालकांनाही या म्हशीच्या दुधाला चांगला भाव मिळतो. मुऱ्हा म्हशीच्या दुधाच्या किमतीबद्दल बोलायचे झाले तर त्याची किंमत बाजारात चांगली आहे. या म्हशीची किंमत ५० हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आहे. हिचे डोके लहान असते. त्याच्या शरीराच्या अनेक भागांवर सोनेरी केस असतात. ती दिवसाला २० लिटर दूध देते. यामुळे शेतकऱ्यांसाठी ही म्हैस फायदेशीर आहे. यामुळे शेतकऱ्यांना दूध व्यवसाय करण्यासाठी याचा फायदा होणार होतो.

## रब्बी सूर्यफूल लागवड तंत्रज्ञान

दिवसेंदिवस खाद्यतेलाची मागणी वाढत आहे. जागतिक पातळीवर सोयाबीन, मोहरी, भुईमूग या पिकानंतर सूर्यफूल हे चौथ्या क्रमांकाचे तेलबिया पिक आहे. या पिकाची लागवड खरीप तसेच रब्बी हंगमातही केली जाते. कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही प्रमुख सूर्यफूल उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रातील बरेच शेतकरी या पिकाच्या लागवडीकडे वळत आहेत. सूर्यफूल पिकाच्या लागवडीची महिती आपण जाणून घेऊया.

पूर्वमशागत व लागवडीचा हंगाम : पेरणीआधी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या आडव्या-उभ्या पाळ्या द्याव्यात. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. बियाणे ५ सें.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये. बागायती सूर्यफुलाची लागवड सरी-वरंब्यावर टोकन पद्धतीने करावी. मध्यम ते खोल जमिनीत अंतर ४५ ३० सें.मी. तर भारी जमिनीत ६० बाय ३० सें.मी. ठेवावे. रब्बी हंगामात कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी १५ ऑक्टोबर पूर्वी करावी.

तसेच बागायती सूर्यफुलाची पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करावी. सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक



घेऊ नये.

बीजप्रक्रिया व पिकाचे वाण : पेरणीसाठी सुधारित बियाणांचे वाण ८ ते १० कि.ग्रॅ. तर संकरित बियाणे ५ ते ६ कि.ग्रॅ. प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाच्या प्रतिबंधासाठी प्रतिकिलो बियाणास २ ते २.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी.

सुधारीत वाण : एस.एस. ५६, मॉडर्न, भानू, के.बी.एस.एच. १, एल.एस.एच-३५, एल.एस.एफ.एच १७१,

खत व्यवस्थापन : जमिनीची पूर्वमशागत करताना लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २.५ टन शेणखत टाकावे. कोरडवाहू पिकासाठी माती परीक्षणानुसार हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश हे खत वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरणीच्या वेळी द्यावे. बागायती पिकासाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश द्यावे. यापैकी पेरणीच्या वेळी ३० किलो द्यावे. व पेरणीनंतर १ महिन्याने उर्वरित ३० किलो नत्र द्यावे.

मशागत व पाणी व्यवस्थापन : पेरणीनंतर १५ दिवसांनी सूर्यफुलाची विरळणी करावी. दोन रोपांतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन खुरपण्या कराव्या. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३५ ते ४० दिवसांनी एक अशा दोन कोळपण्या कराव्यात. पिकाची रोपावस्था, फुलकळी, फुलोरा व दाणे भरताना अशा वाढीच्या अवस्थांमध्ये पिकाला पाणी द्यावे.

कृत्रिम परागीभवन : पिकामध्ये दाणे भरण्यासाठी फुलाचे परागीभवन होणे आवश्यक असते. कृत्रिम परागीभवन करण्यासाठी हाताच्या पंजाला तलम कापड गुंडाळून सकाळी ६ ते ११ या वेळेत दर दिवसाआड तीन ते चार वेळा पिकावरून हळूवार हात फिरवावा. मधमाश्यांच्या चार ते पाच पेट्या एक हेक्टर पिकात ठेवाव्यात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५०२ : आपल्या चौथ्या व शेवटच्या सफरीत ख्रिस्तोफर कोलंबस होंडुरास येथे पोचला.
१९१९ : हॉलंडमधे स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला.
१९२४ : गांधीजींनी हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले.
१९२७ : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना
१९४७ : अमेरिकन गुप्तचर संघटना सी. आय. ए. ची स्थापना.
१९४७ : अमेरिकन वायू दलाची स्थापना करण्यात आली.
१९४७ : भारतीय राष्ट्रीय सुरक्षा कायदा पास करण्यात आला.
१९४८ : निझामाच्या सैन्याने पराभव स्वीकारल्यामुळे 'ऑपरेशन पोलो' स्थगित करण्यात आले.
१९६० : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या शिष्टमंडळचे प्रमुख म्हणून संयुक्त राष्ट्रात आले.
१९६२ : बुरुंडी, जमैका, र्?वांडा आणि त्रिनीदाद व टोबॅगो यांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९६७ : साली भारतातील उत्तरपूर्व राज्य नागालँड ने इंग्रजी भाषेला आपली राजकीय आधिकारिक भाषा म्हणून घोषित केलं.
१९९७ : महाराष्ट्र सरकारने कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना रामटेक नागपुर केली.
१९९९ : साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर
२००२ : चित्रपट क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेले दिग्दर्शक हृषिकेश मुकर्जी यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते 'दादासाहेब फाळके पुरस्कार' हा चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.
२००९ : टेलिव्हिजनवर सलग ७२ वर्षे आणि त्याआधी रेडिओवर सलग १५ वर्षे सुरू असलेल्या 'द गायडिंग लाईट' या मालिकेचा शेवटचा भाग प्रसारित करण्यात आला.
२०१४ : स्कॉटलंड युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्याच्या विरोधात ५५% ते ४५% मते दिली.
२०१६ : सरकारविरोधी दहशतवाद्यांनी कश्मीरमध्ये १७ भारतीय लष्कराचे जवान ठार मारले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५३ : ट्राजान रोमन सम्राट (मृत्यू: ९ ऑगस्ट ११७)
१७०९ : सॅम्युअल जॉन्सन ब्रिटिश साहित्यिक, टीकाकार, पत्रकार व विचारवंत (मृत्यू: १३ डिसेंबर १७८४)
१८८३ : इंग्लंडमध्ये शिकत असतांना ब्रिटीश अधिकारी विलियम कर्झन व्हायली यांची हत्या करणारे थोर भारतीय क्रांतिकारक व स्वातंत्र्य सेनानी शहीद मदन लाल धिंग्रा यांचा जन्मदिन.
१८९५ : जॉन डायफेनबेकर कॅनडा देशाचे १३वे पंतप्रधान (निधन: १६ ऑगस्ट १९७९)
१८९५ : ब्रिटीश कालीन भारतातील नवानगर राज्याचे महाराज व ब्रिटीश संघातील भारतीय कसोटी क्रीकेटपटू महाराजा रणजीत सिंह यांचा जन्मदिन.
१९०० : शिवसागर रामगुलाम मॉरिशस देशाचे पहिले मुख्यमंत्री, पंतप्रधान व गव्हर्नर जनरल (मृत्यू: १५ डिसेंबर १९८५)
१९०५ : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (मृत्यू: १५ एप्रिल १९९०)
१९०६ : प्रभूलाल गर्ग ऊर्फ 'काका हाथरसी' हिन्दी हास्यकवी, पद्मश्री (१९८५). ते विडंबनकाव्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांची सुमारे दीडशे पुस्तके प्रसिद्ध झाली. 'मेरा जीवन ए वन' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. १९३२ मध्ये त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताला वाहिलेले 'संगीत' हे मासिक सुरू केले, ते आजतागायत चालू आहे. (मृत्यू: १८ सप्टेंबर १९९५ हाथरस, उत्तर प्रदेश)
१९१२ : गजानन हरी तथा राजा नेने चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७५)
१९४५ : मॅक्फि चे संस्थापक जॉन मॅक्फि यांचा जन्म.
१९५० : भारतीय अभिनेते विष्णुवर्धन यांचा जन्म. (मृत्यू: ३० डिसेंबर २००९)
१९५० : पद्मश्री व राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री शबाना आझमी यांचा जन्मदिन.
१९५६ : अनंत गाडगीळ भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार
१९५७ : लॉईड मॉरिसन एच. आर. एल. मॉरिसनचे संस्थापक (निधन: १० फेब्रुवारी २०१२)
१९६८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि राजकारणी उपेंद्र राव यांचा जन्म.
१९७१ : अमेरिकन सायक्लिस्ट लान्स आर्मस्ट्राँग यांचा जन्म.
१९८३ : भारतीय दूरदर्शन मालिका कलाकार सनाया इरानी यांचा जन्मदिन.
१९८९ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय बॅडमिंटन खेळाडू अश्विनी पोन्नापा यांचा जन्मदिन.
२००४ : नोदिरबेक अब्दुसत्तोरोव उझबेक बुद्धिबळ ग्रँडमास्टर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य उठावातील अग्रगण्य क्रांतिकारी तात्या टोपे यांचे निधन.
१८९९ : बंगाल नवजागृतीचे भारतीय लेखक आणि बौद्धिक राजनारायण बसु यांचे निधन.
१९५८ : भारतरत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय थियोसोफिस्ट आणि सार्वजनिक व्यक्ती भगवान दास यांचे निधन.
१९९२ : मुहम्मद हिदायतुल्लाह भारताचे सहावे उपराष्ट्रपती (२० ऑगस्ट १९७९ २० ऑगस्ट १९८४) आणि ११ वे सरन्यायाधीश (२५ फेब्रुवारी १९६८ १६ डिसेंबर १९७०) (जन्म: १७ डिसेंबर १९०५ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९३ : असित सेन विनोदी अभिनेते व दिग्दर्शक, त्यांनी सुमारे ५०० चित्रपटांतून भूमिका केल्या (जन्म:
१९९५ : प्रभूलाल गर्ग ऊर्फ 'काका हाथरसी' हिन्दी हास्यकवी, पद्मश्री (१९८५). ते विडंबनकाव्यासाठी प्रसिद्ध होते.(जन्म: १८ सप्टेंबर १९०६)
१९९९ : अरुण वासुदेव कर्नाटकी मराठी चित्रपट दिग्दर्शक (जन्म:)
२००२ : शिवाजी सावंत साहित्यिक. त्यांची 'मृत्यूंजय' ही कादंबरी इंग्रजी, कन्नड, गुजराती, मल्याळी इ. भाषांमध्ये प्रसिद्ध झाली.(जन्म: ३१ ऑगस्ट १९४०)
२००४ : डॉ. भालचंद्र दिनकर फडके दलित साहित्याचे मर्मग्राही समीक्षक (जन्म: १३ मे १९२५)
२०१३ : भारतीय राजकारणी वेलियाम भरगवण यांचे निधन.

## थोडक्यात



### श्रीक्षेत्र निळकंठेश्वर येथे ऋषीपंचमीनिमित्त संतपूजन

मंठा। प्रतिनिधी

श्रीक्षेत्र निळकंठेश्वर येथे ऋषीपंचमीनिमित्त संत संमेलन व ऋषी पूजन सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यास भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे तसेच प्रतिष्ठित व्यापारी शिवाजीराव मोरे यांनी सपत्नीक श्री श्री १००८ महामंडलेश्वर आचार्य स्वामी कृष्णचैतन्य पुरीजी महाराज यांचे विधिवत पूजन करून आशीर्वाद घेतले. ऋषीपंचमीच्या निमित्ताने संत-महंतांचे दर्शन व पूजन करण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. संत संमेलन, ऋषी पूजन आणि धार्मिक कार्यक्रमामुळे श्रीक्षेत्र निळकंठेश्वर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी श्रद्धेने सहभागी होत धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला.

### जि प प्रशाला गुडसूर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

लातूर । प्रतिनिधी

धजारोहन शाळेचे मुख्याध्यापक गिरी सर यांच्या शुभहस्ते करण्यात आला,या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ. अश्विनीताई अशिष मुडपे. उपाध्यक्ष श्री गोविंद



डूबूकवाड, श्री मधुसुदन गुडसूरकर शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी उपस्थितीत. होते सूत्रसंचालन श्री देमगुंडे राम सर यांनी केले. या वेळी शाळेतील मुला मुलीचे मराठवाडा दिनानिमित्य भाषण घेण्यात आले, तसेच प्रमुख पाहुणे श्री मधूसूदन गुडसूरकर यांनी मार्गदर्शन केले, श्री गिरी सरानी पण माहिती सांगीतली देमगुंडे सरानी गुडसूर गावातील स्वातंत्र्य सैनिकाचे सर्वाचे नावे सांगून त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. गुडसूरच्या मातीत जन्माला आलेला प्रत्येक व्यक्ती हा विविध क्षेत्रामध्ये कार्य करून आपल्या गावचे नाव करतात, सामाजिक राजकीय शैक्षणिक उदयोग प्रगतशिल शेतकरी पत्रकार याचे उल्लेख नीय कार्य करतात यांचा सार्थ अभिमान आहे या विषयी माहिती दिली स न १९८४ च्या माजी विद्यार्यातर्फे मुलांना शैक्षणिक साहित्य वहयाचे वाटप करण्यात आले. अभार श्री मुंढे सरानी मानले.

### तिरंगा गणेश मंडळात पत्रकारांच्या हस्ते महाआरती संपन्न

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरातील तिरंगा गणेश मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात पत्रकार बांधवांच्या हस्ते महाआरती उत्साहपूर्ण



वातावरणात संपन्न झाली. यावेळी गणरायाची मनोभावे पूजा करून बळीराजाला दुष्काळाच्या संकटातून मुक्त करावे, शेतकरी बांधवांवरील संकटे दूर करून सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना करण्यात आली.महाआरतीनंतर काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात तालुकाध्यक्ष विवेक घारे यांच्या वतीने उपस्थित पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी तालुकाध्यक्ष निळकंठ वायाळ, डॉ. शरद शेळके, संतोष रामपूरकर, सुरेश वाव्हळे, नासेर तांबोळी, आबासाहेब पुणेकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी पत्रकार संतोष दायमा, नागेश कुलकर्णी, अनिल बा. खंदारे, रणजीत बोराडे, रवी भावसार, डॉ. आशिष तिवारी, योगेश राठोड आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. गणेशोत्सवाच्या निमित्ताने पत्रकार व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

# मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी झालेल्या ऐतिहासिक संग्रामात जालना जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. या लढ्यातील हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचे स्मरण आजही जालना जिल्ह्याच्या इतिहासात अभिमानाने केले जात असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार



हिकमत उढाण, माजी आमदार राजेश टोपे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, महानगर पालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलिस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल पुढे म्हणाल्या की, मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालना जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. परतूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाला या लढ्याच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. कोलते पिंपळगावकरांनी २२ जून १९४८ रोजी रझाकारांविरुद्ध सशस्त्र लढा दिला. जिल्ह्यातील विविध ठिकाणी जंगल सत्याग्रह ही झाले.नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजना, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती घरपोच उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या 'जालना मित्र' पोर्टलच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात २ हजार ४६२ नागरिकांना घरपोच प्रमाणपत्रे वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.प्रारंभी मान्यवरांनी टाऊन हॉल परिसरात लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.यावेळी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

## रेणापूर पोलिसांची हातभट्टीविरोधात धडक कारवाई

### एकाच दिवशी ५ गुन्हे दाखल; १ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त, हजारो लिटर रसायन व हातभट्ट्या नष्ट

रेणापूर : प्रतिनिधी

अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात रेणापूर पोलिसांनी धडक मोहीम राबवत एकाच दिवशी ५ स्वतंत्र गुन्हे दाखल केले. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे रेणापूर राहुल केंगले यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे १ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, हजारो लिटर गुळमिश्रित रसायन व हातभट्टी निर्मितीचे साहित्य नष्ट करण्यात आले.

दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी रेणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वसंतनगर तांडा परिसरात अवैध हातभट्टी दारू निर्मिती होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापेमारी केली. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल केंगले यांनी कारवाईचे नेतृत्व करत पथकाला आवश्यक सूचना दिल्या. छापेमारीदरम्यान हातभट्टी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे हजारो लिटर गुळमिश्रित रसायन, निकृष्ट दर्जाचा गूळ, प्लास्टिकच्या टाक्या, घागरी, लोखंडी भाते व इतर साहित्य आढळून आले. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. तसेच अवैध दारू निर्मितीसाठी उभारण्यात आलेल्या हातभट्ट्या घटनास्थळीच उद्ध्वस्त करण्यात आल्या.



रसायन व कच्चा माल पंचांच्या उपस्थितीत नष्ट करण्यात आला. या कारवाईत संबंधित प्रकारांबाबत ५ स्वतंत्र गुन्हे दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात रेणापूर पोलिसांची कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल केंगले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे, पोलीस अमलदार शिवराज अनंतवाड, विश्वास जाधव, दत्तात्रेय गिरी, होमगार्ड, महिला होमगार्ड व इतर पोलीस अंमलदारांनी केली.

## मुलींनी शिक्षणासोबतच आरोग्याची काळजी घ्यावी– मनिषा राजपेठे

अहमदपूर । प्रतिनिधी

शाळेतील किशोरी मुलींनी शिक्षणासोबतच आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि आपले आरोग्य सुदृढ आणि निरोगी ठेवावे तरच आपला विकास होऊ शकतो त्यामुळे प्रत्येक मुलीने शिक्षणासोबतच आपल्या वैयक्तिक जीवनाकडे लक्ष देऊन आरोग्याची काळजी घेतली पाहिजे असे आव्हान मनिषा राजपेठे यांनी केले.

हनुमंतराव देशमुख माध्यमिक विद्यालय नांदुरा बुद्रुक ता अहमदपूर येथे पुकार संवेदना संकल्प ग्रुपच्या वतीने किशोरी मुलीसाठी एकदिवसीय आरोग्य विषयक कार्यशाळा घेण्यात आली यावेळी आरोग्य संदर्भात घ्यावयाची काळजी मासिक पाळीतील शारीरिक बद्दल या संदर्भात सोनाली कल्ले यांनी सविस्तर माहिती दिली यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी दीपक कांबळे यांनी मुलांचे हक्क आणि अधिकार जगण्याचा अधिकार विकासाचा अधिकार सहभागाचा अधिकार आणि संरक्षणाचा अधिकार



यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आपल्या परिसरातील एखाद्या मुलावर अन्याय अत्याचार होत असेल तर दात कोणाकडे मागायची तक्रार कुठे आणि कशी करायची यासंदर्भात माहिती दिली या कार्यक्रमाला मुख्याध्यापक सूर्यवंशी एन के सहशिक्षक कुलकर्णी आर यु कुटे एस आर सुरकुटे एस एम महेश पुट्टेवाड देशमुख सर यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आनंद कंजे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनाली कल्ले नंदा गोरगिळे सुलोचना कानवटे नरसिंग वाघमारे यांनी सहकार्य केले.

## गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकीचा संदेश;गणेश मंडळाचे रक्तदान शिबिर

लातूर । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा संदेश देत पोलीस स्टेशन गांधी चौक हद्दीतील श्री शिवछत्रपती गणेश मंडळ, मोती नगर यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच नागरिकांच्या रस्ते सुरक्षेचा विचार करून मंडळाच्या वतीने ५० हेल्मेटचे वाटप करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत सुवर्णा सराफ गणेश मंडळ, सराफ लाईन यांच्या वतीनेही २१ हेल्मेटचे वाटप करण्यात आले. पोलीस प्रशासनाच्या वतीने गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत दोन्ही गणेश मंडळांनी पुढाकार घेत रक्तदान व हेल्मेट वाटपाचा समाजोपयोगी उपक्रम राबविला. गांधी चौकचे पोलीस निरीक्षक श्री. सुनील रेजितवाड यांच्या हस्ते पार पडला. यावेळी पोलीस अंमलदार उपस्थित होते.



कार्यक्रमास सुवर्णा सराफ गणेश मंडळ, सराफ लाईनचे अध्यक्ष अजय पाटील, तसेच नरसिंग कापसे, गोपाळ भंडे व तानाजी पायाळ उपस्थित होते. त्याचप्रमाणे श्री शिवछत्रपती गणेश मंडळ, मोती नगरचे अध्यक्ष विश्वजीत बुद्रे, उपाध्यक्ष गणेश बतनपुरे, तसेच गणेश कांबळे, आकाश देवकर, कार्तिक कापसे व अजय हुच्चे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळावी, तर हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून दुचाकीस्वारांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जागृती निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता. ''हेल्मेट वापरा, सुरक्षित प्रवास करा'' हा संदेश या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्यातून सामाजिक बांधिलकी, नागरिकांची सुरक्षितता आणि समाजोपयोगी कार्याला चालना मिळावी, या उद्देशाने लातूर शहरातील इतर गणेश मंडळांनीही रक्तदान, हेल्मेट वाटप, वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवावेत, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. 'गणेशोत्सवातून भक्तीबरोबरच समाजसेवा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा संदेश देऊया,'' हा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## सतीश चव्हाण यांना बहुमताने निवडून येण्यासाठी प्रयत्नशील राहणार -मा. आ. चोथे

अंबड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा पवार) अंबड तालुका आढावा बैठक अंबड शहरातील स्वामी समर्थ मंदिर हॉल येथे श्री विनायक चोथे यांच्या संयोजनातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित दादा पवार) चे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार श्री सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात व माजी आमदार शिवाजीराव चोथे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी येऊ घातलेल्या पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीबाबत प्रामुख्याने चर्चा झाल्याचे व झालेली मतदार नोंदणी, प्रारूप यादी छानने व पदवीधर मतदारांच्या संपर्कात राहण्याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हणाले आहे. यावेळी काही कार्यकर्त्यांना पदाधिकारी म्हणून नियुक्ती देत संघटनात्मक जबाबदारी देण्यात आली, ज्या मध्ये गणेश गायकवाड यांची तालुका सरचिटणीस (राष्ट्रवादी युवक काँग्रेस, अंबड),

पृथ्वीराज चव्हाण यांची तालुका उपाध्यक्ष (राष्ट्रवादी युवक काँग्रेस, अंबड), श्री गोपाल सेठ गिल्डा यांची अंबड शहर सरचिटणीस, योगेश वाघ यांची तालुकाध्यक्ष (सोशल मीडिया सेल) व आशाताई खरात यांची शहराध्यक्ष अंबड(महिला आघाडी)



ह्या पदांवर नियुक्ती पत्र देत नेमणूक करण्यात आल्या.त्याच बरोबर विनायक चोथे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस अंबड तालुकाध्यक्ष श्री प्रिसंजित भैय्या करके यांच्या माध्यमातून गौरव खरात, हर्षल कुमकर, धीरज कुमकर, विशाल खरात, सोपान बागल, विजय शिंदे, प्रशांत शिंदे, बादल राठोड, राहुल मगरे, राहुल इंगळे, भागवत सरकटे, सिद्धेश्वर खरात, अर्जुन माने, अभिषेक मुंडे, कृष्णा माळी, तुषार पवार, सचिन गायकवाड, सुनील कोलेकर, ऋषिकेश उघडे आदी युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी( अजित दादा पवार) मध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी कार्यक्रमासाठी जिल्हाकार्याध्यक्ष चंद्रकांत करके, रामशेठ लांडे,जयमंगल जाधव, रज्जाक शेख, प्रल्हाद ढोकळे, सतीश धुपे, शहराध्यक्ष नंदकिशोर पुंड, अमोल टोपे, सुनील गाडे, मुख्याध्यापक दुर्गे,आदी सह कार्यकर्ते पदवीधर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासकीय कामगिरीची दखल ; पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना 'लातूर भूषण' पुरस्कार

### हा पुरस्कार माझा नसून लातूर पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी-अंमलदाराच्या वतीने स्वीकारत आहे- तांबे

लातूर । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, जिल्हा शाखा लातूर यांच्या वतीने उल्लेखनीय प्रशासकीय कामगिरीची दखल घेऊन लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांना 'लातूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दयानंद सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे राखण्यासोबतच पोलीस दलाला अधिकाधिक समाजाभिमुख, नागरिकांशी संवाद साधणारे आणि लोकांच्या समस्या जाणून घेणारे पोलीस दल म्हणून विकसित करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ऑगस्ट २०२६ पासून 'पोलीस विद्यार्थी संवाद' हा उपक्रम सुरू करण्यात आला. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, नवीन कायदे, सायबर गुन्हे व फसवणूक, वाहतूक नियम, डायल ११२, दामिनी पथक, शस्त्र कायदा आणि सुरक्षिततेच्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर' हा उपक्रम राबविण्यात आला. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या विविध समस्या समजून घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांशी पोलिसांचा थेट संपर्क वाढण्यास मदत झाली.



शहरी भागात 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' या उपक्रमातून विविध गृहनिर्माण सोसायट्यांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधण्यात आला. परिसरातील सुरक्षा, वाहतूक, कायदा व सुव्यवस्था तसेच स्थानिक समस्यांची माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण आणि त्यातील मृत्यूचे गांभीर्य लक्षात घेऊन हेल्मेट वापराबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली.

त्यानंतर १ सप्टेंबर २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात हेल्मेट नियमाच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. नागरिकांना दंड करणे हा उद्देश नसून दुचाकीस्वारांचे प्राण वाचविणे आणि अपघातामध्ये होणाऱ्या गंभीर दुखापती व मृत्यूचे प्रमाण कमी करणे, हा या मोहिमेमागील प्रमुख उद्देश आहे. यासोबतच रक्तदान शिबिरे, सामाजिक संस्थांशी समन्वय, नागरिक जनजागृती आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये पोलीस दलाचा सहभाग वाढविण्यात आला आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्यासोबतच समाजातील विविध घटकांशी संवाद वाढविण्यावर लातूर पोलीस दलाने भर दिला आहे.

पुरस्काराचे श्रेय संपूर्ण पोलीस दलाला

पुरस्कार स्वीकारताना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी या सन्मानाचे श्रेय स्वतःकडे न घेता संपूर्ण लातूर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांना दिले. ''लातूर भूषण हा माझा वैयक्तिक पुरस्कार नाही. विविध समाजाभिमुख उपक्रम यशस्वीपणे राबविण्यामागे लातूर पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी आणि अंमलदाराची मेहनत व सहकार्य आहे. त्यामुळे हा पुरस्कार मी त्यांच्या वतीने स्वीकारत आहे,'' असे त्यांनी सांगितले.

समाजातील विविध घटकांशी थेट संवाद साधत कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच नागरिककेंद्री पोलीसिंगला प्राधान्य देणाऱ्या लातूर पोलीस दलाच्या कार्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली. सदर कार्यक्रमाला लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी डॉक्टर बाष्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्यासह प्रशासनातील उच्चस्पद अधिकारी तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२६ | ६

# नगरपालिकेचा ‘तुम्हारे खत मे हमारा सलाम’

## रेल्वे बोर्डाच्या कार्यक्रमात तारांगण आणि नाट्यगृहाच्या सुशोभीकरणाचे करून घेतले उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला प्रगतीच्या मार्गावर नेणारी आणि जिल्ह्याची अस्मिता असलेली बीड –पुणे रेल्वे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त सुरू झाली. या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार या उपस्थित होत्या. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ध्वजारोहनानंतर सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम झाला. मात्र याच कार्यक्रमांमध्ये नगरपालिकेने दमडीही खर्च न करता ‘तुम्हारे खत मे हमारा सलाम’ या म्हणीप्रमाणे बीड शहरातील नाट्यगृहाच्या सुशोभीकरणाचा शुभारंभ आणि तारांगणाच्या कामाचा शुभारंभ करून घेतला. ही दोन्ही कामे नगरपालिकेच्या आखत्यारीत येतात. मात्र रेल्वे बोर्डाच्या खर्चात यांनी आपले उद्घाटन करून घेतले.

बीड जिल्ह्याची अस्मिता असलेली रेल्वे किमान बीड पासून पुण्यापर्यंत सुरू झाली. काही दिवसानंतर ही गाडी परळीपर्यंत




सुरू होईल असे सांगितले जात आहे. सध्या तरी बीड ते पुणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची या रेल्वे मार्गामुळे सोय झाली असून त्याची वेळही प्रवाशांच्या सोयीची असल्याने या रेल्वे वाहतुकीला उस्फूर्त प्रतिसाद मिळेल यात शंका नाही. रेल्वे बोर्डाने या रेल्वेच्या शुभारंभ प्रसंगी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार यांना निमंत्रित केले होते. याबरोबर जिल्ह्यातील खासदार आणि आमदारांनाही निमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये ज्यांनी ज्यांनी रेल्वे आंदोलनात सहभाग घेतला आणि जे हयात आहेत अशा सर्व स्वातंत्र्यसैनिक आणि रेल्वे कृती समितीच्या सदस्यांना ही निमंत्रित करण्यात आले होते. मात्र त्यांना व्यासपीठावर मानाचे स्थान मिळाले नाही. ◀◀ पान ३ वर

### स्व.काकूंचा साधा उल्लेख नाही

परळी नगर रेल्वे मार्गासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आणि तीन वेळा बीडच्या खासदार राहिलेल्या स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांचा या व्यासपीठावरून उल्लेख व्हायला हवा होता. त्यांच्या योगदानाबद्दलची वाच्यता व्हायला हवी होती. मात्र या ठिकाणी संपादक स्वर्गीय नामदेवराव क्षीरसागर, युवा कार्यकर्ते स्वर्गीय अमोल गलधर यांचा उल्लेख झाला. मात्र स्वर्गीय केशर काकूंच्या नावाचा उल्लेख करण्याची खासदार सोनवणे यांना लाज वाटली आणि पालकमंत्री सुनेत्राताई पवार याही रितसर विसरल्या या बाबीबद्दल स्वर्गीय काकू समर्थकांमध्ये जिल्हाभरात नाराजी व्यक्त केली जात आहे.

### नगरसेवकांनी पत्रकारांना ग्राउंड दाखवले

रेल्वे बोर्डाच्या या कार्यक्रमांमध्ये नगरपालिकेच्या कार्यक्रमाची घुसखोरी करण्यात आली. एवढेच नाही तर पत्रकार कक्षामध्ये अनेक नगरसेवकांनी ही घुसखोरी केली. त्यामुळे पत्रकारांना बसण्यासाठी जागा उरली नाही. त्यांना जमिनीवर बसावे लागले. ही बाब जिल्ह्यासाठी सन्मानाची नाही. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना व्यासपीठावरून खाली यावे लागले. अनेक कार्यक्रमांमध्ये अशी घुसखोरी होते. आणि संयोजकाकडून याला कुठलाही मज्जाव होत नाही हे विशेष. त्यावरून या कार्यक्रमाच्या नियोजन किती ढिसाळ होते हे स्पष्ट होते.

## बीड येथे शिक्षक भवन उभारण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

पुण्याच्या धर्तीवर बीडमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शिक्षकांना हक्काचे व्यासपीठ म्हणून बीड शहरामध्ये शिक्षक भवन उभारावे अशी मागणी शिक्षक आमदार आमदार विक्रम काळे यांच्यासह महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाच्या वतीने पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी आ. विजयसिंह पंडित राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चव्हाण हे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की बीड जिल्ह्यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक आणि विविध कार्यक्रमासाठी पुण्याच्या धर्तीवर शिक्षकांसाठी हक्काचे शिक्षक भवन असावे जेणेकरून जिल्ह्याचा सांस्कृतिक विकास होईल आणि शिक्षकांना



महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाचे पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल. यासाठी शिक्षक भवन उभारावे अशी मागणी संघाच्यावतीने करण्यात आली आहे. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे,आ. विजयसिंह पंडित, राजेश्वर चव्हाण बीड जिल्हा अध्यक्ष प्रा. शिवाजी खांडे, कोषाध्यक्ष प्रा. छायाताई सोंडगे, कार्याध्यक्ष प्रा. राजकुमार कागदे,प्रा. शाहूराव साखरे यांची उपस्थिती होती.

## आ.सुरेश धस यांनी मांडले उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमोर दुष्काळाचे वास्तव

आष्टी । प्रतिनिधी

पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाण आणि पावसातील मोठ्या खंडामुळे आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यांत खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली



आष्टी–पाटोदा–शिरूरसाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी

झालेल्या आढावा बैठकीत आ. सुरेश धस यांनी मतदारसंघातील दुष्काळाचे वास्तव मांडले.

आष्टी तालुक्यात ६८ हजार ५५० हेक्टर, पाटोदा तालुक्यात ५८ हजार ९१३ हेक्टर आणि शिरूर कासार तालुक्यात ४७ हजार ५४४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. पावसाअभावी सोयाबीन, तूर, उडीद, मूग, मका, बाजरी व कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांचे तातडीने गावनिहाय वस्तुनिष्ठ पंचनामे करून नुकसानभरपाई व अनुदान द्यावे, फळबागांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, गरज असलेल्या गावांत टँकर सुरू करावेत तसेच आष्टी-पाटोदा-शिरूरमध्ये चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी आ. धस ◀◀ पान ३ वर

## शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या तरुणाचा करंट लागून मृत्यू

वडवणी । प्रतिनिधी

शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या २७ वर्षीय तरुणाला महावितरणाचा करंट लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दि १७ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास चिंचोटी शिवारात घडली आहे.



वडवणी तालुक्यातील मौजे चिंचोटी येथील रहिवासी असणारे तरुण शेतकरी मोरेश्वर अण्णासाहेब गोंडे या २७ वर्षीय तरुण चिंचोटी शिवारात असणाऱ्या शेतातील पीक पावसा अभावी करपून जात असल्याने शेतात पाणी देण्यासाठी गेला होता. विद्युत पाण्याची मोटार चालू करत असताना अचानक विद्युत प्रवाह उतरला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. उपचारासाठी वडवणी येथील खाजगी रुग्णालयात आणले परंतु डॉक्टरांनी ◀◀ पान ३ वर

## आष्टी तालुक्यात अवैध धंद्यांचा विळखा तरुणाई व्यसनाच्या आहारी जाण्याची भीती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात अवैध दारूविक्री, गांजाची उपलब्धता तसेच मटका यांसारख्या प्रकारांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः सकाळपासूनच काही ठिकाणी मद्यपींची गर्दी होत असल्याच्या तक्रारी असून, गांजा सहज उपलब्ध होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकारांमुळे तालुक्यातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

**दारू, गांजा, मटका यांसारख्या प्रकारांबाबत नागरिकांच्या तक्रारी; प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष**

तालुक्यातील काही भागांत अवैध दारूविक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. कारवाई होत असली तरी अवैध विक्रीला पूर्णपणे आळा बसलेला नाही, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत. संबंधित ठिकाणी नियमित तपासणी आणि प्रभावी कारवाईची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त होत आहे.

गांजाच्या उपलब्धतेबाबतही प्रश्नचिन्ह

गांजावर कायद्याने बंदी असतानाही तालुक्यात काही ठिकाणी तो सहज उपलब्ध होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. जर या तक्रारींमध्ये तथ्य असेल, तर गांजा नेमका कुठून येतो, त्याची विक्री कोण करीत आहे आणि या साखळीमागे कोण आहेत, याचा तपास होणे गरजेचे आहे. विशेषतः तरुणांपर्यंत अमली पदार्थ पोहोचू नयेत, यासाठी पोलिस प्रशासनाने अधिक प्रभावी पावले उचलण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

मटका सुरू असल्याचीही चर्चा

दरम्यान, तालुक्यातील काही भागांत मटका सुरू ◀◀ पान ३ वर



## मोठेवाडी ग्रामपंचायत कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्राम पंचायत कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या प्रतिमेचे पुजन करून सरपंच सत्यभामा दळवी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सत्यभामा दळवी तर ग्रामसेवक जितेंद्र इंगोले, माजी सरपंच ◀◀ पान ३ वर

## शेतकऱ्यांना पुन्हा उभं करण्यासाठी तातडीची नुकसान भरपाई आणि कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची गरज - आ.सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२६-२७ मधील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांच्या अध्यक्षतेखाली दि १७ सप्टेंबर गुरुवार रोजी बैठक संपन्न झाली.या बैठकीत बीड जिल्ह्यातील पीक नुकसान, वीजपुरवठा आणि पाणीटंचाईच्या अनुषंगाने महत्त्वाच्या मागण्या आ.प्रकाश सोळंके यांनी मांडल्या.

बीड जिल्ह्यातील सद्य पीक परिस्थितीचा विचार करता पावसा अभावी मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असून अनेक भागांमध्ये १०० टक्के नुकसानीची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर तांत्रिक



बाबींमध्ये न अडकता वस्तुनिष्ठ परिस्थितीच्या आधारे माणुसकीच्या नात्याने नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे आ.सोळंके यांनी सांगितले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एन.डी.आर.एफ. निकषानुसार सरसकट तिप्पट नुकसान भरपाई देण्यात यावी.ही नुकसान भरपाईची रक्कम एका महिन्याच्या आत शेतकऱ्यांना उपलब्ध झाल्यास त्यांना पुढील हंगामासाठी पुन्हा उभे राहण्यास मोठी मदत होईल.तसेच जिल्ह्यातील परिस्थिती पाहता कोरडा दुष्काळ जाहीर करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा.वीजपुरवठ्याच्या अनुषंगाने आपत्कालीन वीजपुरवठा खंडित होण्यामुळे शेतकऱ्यांना नियोजित आठ तासांचा पुरवठाही नियमितपणे मिळत नाही. अनेक ठिकाणी दोन तासांचाही सुरळीत वीजपुरवठा होत नसल्याचे ◀◀ पान ३ वर

## आष्टीत ‘आरोग्यम वेलनेस सेंटरच्या माध्यमातून विनामूल्य दिले जाणार फिटनेसचे धडे –जगताप

आष्टी । प्रतिनिधी

आरोग्यदायी जीवनशैली, योग्य आहार आणि निरोगी शरीर याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आष्टी शहरात ‘आरोग्यम वेलनेस सेंटर ( )’ या नव्या उपक्रमाची सुरुवात होत आहे. या केंद्राचा भव्य उद्घाटन शुभारंभ शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला आहे. फास्ट फूड जंक फूड तसेच केमिकल युक्त खाद्यपदार्थामुळे शरीरामध्ये होणारे आजार व चरबी कमी करण्याकरता आज प्रत्येकाला व्यायामाची गरज आहे यातूनच व्हेरी नाईस फिटनेस सेंटरच्या माध्यमातून रामदास जगताप व उर्मिला जगताप हे राज कॉम्प्लेक्स मध्ये नव्याने सुरू करत असलेल्या वेलनेस फिटनेस सेंटरच्या माध्यमातून अष्टीकरांना नक्कीच आपले निरोगी शरीर राखण्याकरिता एक मोठे माध्यम ठरणार आहे या दालनाचे उद्घाटन समारंभ

या शुभारंभ सोहळ्यास माजी मंत्री तथा आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. तसेच माजी आमदार साहेबरावजी धस (नाना), जागतिक आरोग्य सल्लागार डॉ. नितेश ढुमणे, जागतिक आरोग्य सल्लागार इंगळे अंबादास सर, तसेच देविदास (आबा) धस यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

‘आम्ही आरोग्यावर काम करतो...’ या संकल्पनेतून सुरू होत असलेल्या या वेलनेस सेंटरच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीबाबत माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याकडे वाढलेले दुर्लक्ष लक्षात घेता अशा उपक्रमांचे महत्त्व वाढले आहे. हा शुभारंभ सोहळा आराज मल्टीपर्पज हॉल अँड कॉम्प्लेक्स, खडकत रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आयोजकांनी आवाहन रामदास जगताप, उर्मिला जगताप यांनी केले आहे. निरोगी जीवनशैलीकडे एक पाऊल‘आरोग्यम वेलनेस सेंटर’च्या माध्यमातून आरोग्य जागृतीचा नवा उपक्रम आष्टीत आकारास येत आहे.

# युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलनास यश, १००% धरण भरल्यास मोजणी होणार

## पोटभरे,जगताप, नाईकनवरे यांनी पाठिंबा देत पाण्यात उतरून केले आंदोलन !

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरणाची अर्धा मीटरने उंची वाढणार असल्याने धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणार आहेत.या धरणाची उंचीला विरोध करण्यासाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि १७ सप्टेंबर गुरुवार रोजी मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त माजलगाव धरणात जलसमाधी आंदोलनासाठी शेकडो कार्यकर्ते धरणातील पाण्यात उतरले होते.आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते मोहनराव जगताप,माजी सभापती नितीन नाईकनवरे, आजाद सेनाचे राजेश घोडे, भाजपच्या रूपाली कपरे (नाईकनवरे) यांनी स्वतः या आंदोलनात उतरून तब्बल दोन तास माजलगाव धरणाच्या जलाशयात उतरून आंदोलन करत पाठिंबा दिला. याबाबत धरण परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात असून जलतरण पथक धरणावर दाखल झाले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्याने लेखी आश्वासन दिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका शेतकरी युवा संघर्ष समितीच्या आंदोलनकर्त्यांनी घेतला आहे. जलसंपदा विभागाच्या माजलगाव धरणात गेल्या ४० वर्षापासून साचलेला गाळ काढला,तर धरणाची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. परंतु तसे न करता केवळ माजलगाव धरणाची उंची अर्धा मीटरने वाढवण्याच्या जलसंपदा विभागाच्या निर्णयास आमदार प्रकाश सोळंके



यांच्या पाठिंबा असल्याने त्यांच्या विषयी धरणग्रस्त व शेतकरी युवा संघर्ष समितीच्या आंदोलनकर्त्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

त्यामुळे आमदार प्रकाश सोळंके यांनी पाठिंबा देऊन या प्रकरणी युवा संघर्ष समितीचे कार्यकर्ते यांच्यात धरणाची वाढीबाबत होत असलेल्या संघर्षाची सुरुवात माजलगाव धरणातील जलाशयात जलसमाधी आंदोलन करण्याच्या निर्णयाने झाली. माजलगाव धरणात शेकडो आंदोलनकर्ते माजलगाव जलाशयात शिरले असून,जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही धरणाच्या बाहेर येणार नसल्याचा पवित्रा आंदोलनकर्त्यांनी यावेळी घेतला. यामुळे हे आंदोलन जास्त काळ चालणार असल्याचे परिस्थितीवरून दिसत होते.

### आंदोलन स्थळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त

माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, साह्यक पोलीस निरीक्षक के.पी. नेहरकर यांच्या गटाला बंदोबस्त लावला असून, धरणात अनुचित प्रकार घडू नये म्हणून विविध पथके तैनात करण्यात आली होती.यावेळी पोलीस उपनिरीक्षक संदीप रोडे, स्थानिक पोलीस यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी या आंदोलनस्थळी ठाण मांडून बसलेले होते.

या आंदोलनात बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप,माजी सभापती नितीन नाईकनवरे, राजेश घोडे यांनी पाण्यात उतरून धरणाची उंची वाढीबाबतही धरणग्रस्त लोकांच्या आंदोलनाला पाठिंबा देत सहभाग नोंदवला.

धरण परिसरात जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता तिडके, उपविभागीय अभियंता शितल माने यांनी धरण परिसरात येऊन आंदोलनकर्त्यांना ‘‘आपले आंदोलन मागे घ्या, आम्ही तुमच्या भावना शासनाला कळवू,‘‘ असे आश्वासीत केले. मात्र,जोपर्यंत लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26